शनिवार, १२ नोव्हेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ११५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

कणखर भूमिकेमुळे ‘ती’ अतिक्रमणे हटली/२
सहा आसनी रिक्षाचालकांचे आंदोलन स्थगित/५
सचिन, युवराजकडून टीम इंडियाची पाठराखण/८

## पुण्यातील स्कूल बसला माणगावजवळ अपघात



**माणगाव :** पुण्यातील स्कूल बसला रायगड जिल्ह्यातील माणगावजवळील घरोशी वाडी येथे शुक्रवारी (दि. ११) अपघात झाला. निगडी येथील ज्ञान प्रबोधिनी शाळेतील शिक्षक पालक संघाची सहल रायगड जिल्ह्यात आली होती. या अपघातात सुमारे सात जण जखमी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सहलीसाठी आलेली बस घरोशी वाडी येथे १५ ते २० फूट दरीत कोसळली. सुदैवाने ती झाडाला अडकल्याने मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार जखमींपैकी दोन जणांची प्रकृती गंभीर असून त्यांना माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आल्याचे समजते. ही सहल किल्ले रायगडच्या रस्त्यावर असताना हा अपघात झाला. अपघातामागील नेमके कारण अद्याप कळू शकलेले नाही.

# राष्ट्रवादीच्या जितेंद्र आव्हाडांना अटक

## ‘हर हर महादेव’ चित्रपटप्रकरणी राडा भोवला

**ठाणे : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांना पोलिसांनी अटक केली आहे. आव्हाड व त्यांच्या कार्यकर्त्यांनी काही दिवसांपूर्वी ठाण्याच्या विवियाना मॉलमध्ये सुरू असलेला ‘हर हर महादेव’ चित्रपटाचा शो बंद पाडला होता. या वेळी एका प्रेक्षकाला मारहाणही करण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसांनी शुक्रवारी (दि. ११) कारवाई केली.

‘हर हर महादेव’ चित्रपटात इतिहासाचे विकृतीकरण झाले असून छत्रपती शिवाजी महाराजांची बदनामी करण्यात आली आहे, असे सांगत आव्हाड यांनी सोमवारी रात्री ठाण्यातील विवियाना मॉलमधील सिनेमागृहात राडा केला होता. या राड्याप्रकरणी आव्हाड यांच्यासह १०० कार्यकर्त्यांवर वर्तकनगर पोलीस ठाण्यात कलम १४१,१४३,१४६,१४९, ३२३,५०४, मुंबई पोलीस कायदा कलम ३७/१३५ आदी कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी परीक्षित विजय धुर्वे यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल झाला होता.



राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर करण्यात आलेल्या अटकेच्या कारवाईचे भाजप नेते आमदार अतुल भातखळकर यांनी स्वागत केले आहे. अत्यंत योग्य आणि स्वागतार्ह कारवाई असल्याचे त्यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटले. राज्यात कोणीही कायदा हातात घेऊ शकत नाही. कायद्याप्रमाणे वागावे लागेल हे आव्हाडांनी लक्षात ठेवावे, अशी सल्लावजा सूचनाही त्यांनी या वेळी केली.

दरम्यान, मनसे नेते संदीप देशपांडे यांनीही जितेंद्र आव्हाड यांच्यावरील कारवाईचे स्वागत केले आहे. कायदा आपले काम करीत आहे. ज्या पद्धतीने तुम्ही एका क्षेत्रात जाता, प्रेक्षकांना मारहाण करता ते चुकीचे आहे. सूडबुद्धीने कारवाई करण्याचा प्रश्नच नाही. अशी थेरं करीत असतील तर त्यांना आयुष्यभर जेलमध्ये ठेवले पाहिजे. आधीही मंत्री असताना एकाला घरी बोलावून मारहाण केली होती. त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी आम्ही केली होती. अविनाश जाधव तिथे गेले होते. कारवाई होतेय ही चांगली गोष्ट आहे, अशी प्रतिक्रिया देशपांडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## राजीव गांधींच्या मारेकऱ्यांची सुटका करण्याचे कोर्टाचे आदेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्या प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या नलिनी श्रीहरन, आरपी रविचंद्रन आणि अन्य दोषींची सुटका करण्याचे आदेश शुक्रवारी (दि. ११) सर्वोच्च न्यायालयाने दिले. यामध्ये नलिनी, रविचंद्रन यांच्यासह संथन, मुरुगन, रॉबर्ट पायास, जयकुमार यांचा समावेश आहे. या प्रकरणातील सातवा दोषी एजी पेरारिवालन याची याआधीच सुटका करण्यात आलेली आहे.

राजीव गांधी हत्या प्रकरणातील नलिनी सध्या पॅरोलवर कारागृहाच्या बाहेर आहे. याआधी मद्रास उच्च न्यायालयाने दोषी नलिनीची सुटकेची मागणी करणारी याचिका फेटाळली होती. त्यानंतर तिने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

याच हत्या प्रकरणातील दोषी एजी पेरारिवालन याची १८ मे रोजी सुटका करण्यात



होती. पेरारिवालनने ३० वर्षे शिक्षा भोगलेली आहे. त्याने संविधानातील कलम १४२चा आधार घेत आपल्या सुटकेची मागणी केली होती, तर दोषी नलिनीने पेरारिवालनच्या बाबातीत घेण्यात आलेल्या याच निर्णयाचा दाखला देत माझीही सुटका करावी, अशी मागणी केली होती. अखेर सर्व आरोपींची सुटका करण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत.

माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची एलटीटीई संघटनेने तामिळनाडूतील श्री पेरंबुदूर येथे आत्मघाती बॉम्बहल्ल्याच्या मदतीने २१ मे १९९१ रोजी हत्या केली होती.

## दक्षिण भारतातही वंदे भारत एक्स्प्रेस; पंतप्रधान मोदींनी दाखवला हिरवा झेंडा



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

दक्षिण भारतामधील चार राज्यांच्या दोन दिवसीय दौऱ्यावर असलेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. ११) दक्षिण भारतामधील मैसूर आणि चेन्नईदरम्यानच्या पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसला बंगुळरूमधील केएसआर स्टेशनवरून हिरवा झेंडा दाखवला. यास पंतप्रधान मोदींनी भारत गौरव काशी दर्शन ट्रेनलाही हिरवा झेंडा दाखवला.

तत्पूर्वी पंतप्रधान मोदी सकाळी बंगळुरूच्या एचएएल विमानतळावर पोहचले, जिथे कर्नाटकचे राज्यपाल थावरचंद गहलोत, मुख्यमंत्री बसवराज बोम्मई, मंत्रिमंडळातील अनेक मंत्री, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी, भाजप प्रदेशाध्यक्ष नलिन कुमार कटील, संसदीय बोर्डाचे सदस्य येडियुरप्पा, पक्षाचे आमदार आणि अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले.

## ठाकरे गटाला धक्का! खासदार किर्तीकर शिंदे गटात

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे गटाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे



पक्षाचे खासदार गजानन किर्तीकर यांनी शुक्रवारी (दि. ११) बाळासाहेबांच्या शिवसेनेत प्रवेश केला. मुंबईतील रवींद्र नाट्यमंदिरात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार किर्तीकर यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमास खासदार, आमदार, नेते, पदाधिकारी उपस्थित होते. गजानन किर्तीकर यांच्या प्रवेशाने शिंदे गटातील खासदारांची संख्या १३वर गेली आहे.



**पनवेल : लोकनेते दि. बा. पाटील उरण पनवेल लॉरी मालक सेवा संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर झाली आहे. यामध्ये अध्यक्षपदी संतोष घरत, उपाध्यक्षपदी संकेत ठाकूर, विजय घरत, सचिवपदी सुहास घरत, जॉईंट सेक्रेटरीपदी नंदू ठाकूर, खजिनदारपदी अमोल नाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेऊन आशीर्वाद घेतले. त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी अध्यक्ष विनायक घरत, सचिन घरत, अमृत ठाकूर, डी. आर. पाटील, प्रकाश म्हात्रे, स्वप्नील ठाकूर, समिती पाटील, संदीप पाटील, प्रवीण पाटील, राजेंद्र ठाकूर, विजय नाईक यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.** (छाया : चेतन पोपेटा)

## निवडक

### शिवलिंग सापडलेल्या परिसराचे संरक्षण कायम

**वाराणसी :** येथील ज्ञानवापी मशिदीत सर्वेक्षणादरम्यान शिवलिंग सापडलेल्या भागाला पुढील आदेशापर्यंत संरक्षण देण्याचे आदेश शुक्रवारी (दि. ११) सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवले. त्याचप्रमाणे हिंदू पक्षाला ज्ञानवापी वादावर दाखल सर्व खटल्यांच्या एकत्रिकरणासंदर्भात कोर्टात अर्ज करण्यास परवानगी दिली आहे.

### लाचप्रकरणी अलिबागच्या तहसीलदारांना अटक

**अलिबाग :** येथील महिला तहसीलदार मिनल दळवी आणि खासगी एजंट राकेश चव्हाण यांना लाचप्रकरणी अटक करण्यात आली आहे. नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी (दि. ११) ही धडक कारवाई केली. बक्षीसपत्राने मिळालेल्या जमिनीची नोंद करून निकाल बाजूने द्यावा यासाठी त्यांनी दोन लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप आहे.

## हिंदूविरोधी वक्तव्य करणाऱ्या काँग्रेस नेत्याचा पनवेलमध्ये निषेध



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : वृत्तसंस्था**

कर्नाटक काँग्रेस प्रदेश समितीचे कार्याध्यक्ष सतीश जारकीहोली यांनी हिंदूविरोधी आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपमानास्पद वक्तव्य केले आहे. त्यांच्या कृत्याचा सर्वत्र विरोध होत असून पनवेल भारतीय जनता पक्षाने जारकीहोली यांच्याविरोधात शुक्रवारी (दि. ११) घोषणाबाजी करीत निषेध केला.


या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

या वेळी भाजपचे पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, ज्येष्ठ नेते अजय कांडपिळे, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, युवा मोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, खांदा कॉलनी युवा मोर्चा अध्यक्ष अभिषेक भोपी, गौरव कांडपिळे, देवांशू प्रभाळे, नितेश घुगे, अजिंक्य जाधव, अजित सिंग, प्रसाद कंधारे, अजित पवार, अक्षय सिंग यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी उपस्थितांनी फलक झळकावून आणि घोषणा देऊन सतीश जारकीहोली यांचा जाहीर निषेध केला.

## आरसीएफ थळ परिसरात बिबट्याचे दर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील थळ येथे आरसीएफ प्रकल्प परिसरात दोन दिवसांपूर्वी बिबट्याचे दर्शन झाल्याचे छायाचित्र समाजमाध्यमांवर व्हायरल झाले होते. ही अफवा असल्याची चर्चा होती, पण बिबट्याचे दर्शन झाल्याच्या वृत्ताला आरसीएफ व वनखात्याच्या सूत्रांनी दुजोरा दिला आहे.



दोन दिवसांपूर्वी थळ येथील आरसीएफ कंपनीच्या परिसरामधील झाडीत बिबट्या वावरत असताना गस्त घालणाऱ्यांना दिसला. याची माहिती वनखात्याच्या अधिकाऱ्यांना देण्यात आली. ही बातमी समाजमाध्यमातून वाऱ्यासारखी पसरली. याचा कुणी सत्य, तर कोणी अफवा म्हणून अर्थ काढला. अखेर याबाबत प्रत्यक्ष आरसीएफच्या एका जबाबदार अधिकाऱ्याने समाजमाध्यमातून फिरणारे बिबट्याचे वृत्त खरे असल्याची माहिती दिली. शिवाय वनखात्याच्या सूत्रानेदेखील याला दुजोरा दिला आहे. सुदैवाने हा बिबट्या नागरी वस्तीत शिरला नाही. तो जंगल भागात परत गेल्याचा दावाही वनखात्याच्या सूत्राने केला आहे.

काही दिवसांपूर्वी कोळगाव परिसरात बिबट्याचा वावर असल्याचे वृत्त होते. काही जनावरांवर त्याने हल्ले केल्याचे सांगितले जात होते. आता आरसीएफ परिसरात बिबट्या दिसल्याने तालुक्यातील जंगल भागात बिबट्या आहे, हे स्पष्ट झाले आहे.






# कणखर भूमिकेमुळे ‘ती’ अतिक्रमणे हटली

## प्रतापगडावरील कबरीप्रकरणी भाजप आमदार राणे यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रतापगडावर अफझलखानाच्या कबरीजवळची अतिक्रमणे हटविण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती, मात्र त्याकडे दुर्लक्ष केले गेले. कणखर भूमिका घेत ही अतिक्रमणे हटविल्याबद्दल महाराष्ट्राच्या शिवप्रेमी जनता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करीत आहे, असे प्रतिपादन भाजपचे आमदार नितेश राणे यांनी शुक्रवारी (दि. ११) केले.




भाजप प्रदेश कार्यालयासमोर झालेल्या सभेत आमदार नितेश राणे बोलत होते. अफझलखानाच्या कबरीजवळची अतिक्रमणे हटविल्याबद्दल या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाजप प्रदेश कोषाध्यक्ष आमदार मिहीर कोटेचा, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, भारतीय जनता युवा मोर्चा मुंबईचे अध्यक्ष तेजिंदर तिवाना आदी या वेळी उपस्थित होते.

आमदार नितश राणे म्हणाले की, प्रतापगडावरील अफझलखानाच्या कबरीजवळची अतिक्रमणे हटविण्याची मागणी अनेक दिवसांपासून होते आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन राजकारण करणाऱ्या पक्षांनी या मागणीकडे दुर्लक्ष केले. शिवप्रेमींच्या भावनेचा अनादर केला. हिंदुत्ववादी म्हणविणाऱ्या पक्षांनीही या मागणीकडे लक्ष दिले नव्हते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही अतिक्रमणे हटविण्याची ठाम भूमिका घेतली. याबद्दल महाराष्ट्र उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा आभारी आहे.

महाराष्ट्रात धार्मिक स्थळे, ऐतिहासिक स्थळांच्या ठिकाणी अतिक्रमणे झाली आहेत. विशाळगड, मुंबईतील शिवडीचा किल्ला अशा ठिकाणी झालेली अतिक्रमणे यापुढील काळात हटविली जातील. हिंदूंच्या धार्मिक स्थानांकडे यापुढे वाकड्या नजरेने पाहिले तर ते सहन केले जाणार नाही, असेही आमदार राणे यांनी सांगितले.

# राष्ट्रवादीने पुन्हा सत्तेची स्वप्ने पाहू नये -बावनकुळे

**सातारा : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसने माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर जादूटोणा केला आणि राज्यात बेईमानीने सत्ता मिळविली, पण आम्ही सावध आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनात तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आगामी विधानसभा निवडणुकीत आम्ही किमान २०० जागा जिंकू. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आता राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पुन्हा सत्तेवर येण्याचे स्वप्न सोडून दिले पाहिजे, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि. ११) सांगितले. ते सातारा जिल्ह्याचा संघटनात्मक प्रवास करीत असून पत्रकार परिषदेत बोलत होते.



या वेळी भाजपा सातारा जिल्हाध्यक्ष आमदार जयकुमार गोरे, छत्रपती आमदार शिवेंद्रराजे भोसले, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील व प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ उपस्थित होते. तत्पूर्वी सकाळी त्यांनी श्रीमंत छत्रपती खासदार उदयनराजे भोसले यांची भेट घेतली. महाविकास आघाडी सरकारच्या काळात उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस पक्षाचे सर्व काही स्वीकारले आहे. आता फक्त काँग्रेसचे संविधान त्यांनी स्वीकारायचे बाकी आहे. आपल्या पक्षाचे संविधान म्हणून काँग्रेसच्या संविधानाची नक्कल करून निवडणूक आयोगाला सादर करावी, असाही टोला बावनकुळे यांनी लगावला. ते म्हणाले की, प्रतापगडावर अफजलखानाच्या कबरीजवळचे अतिक्रमण हटवावे म्हणून विश्व हिंदू परिषद, शिवप्रतापगड उत्सव समिती, हिंदू एकता आंदोलन अशा अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी आंदोलने केली. मतांच्या राजकारणासाठी आणि लांगुलचालनामुळे उद्धव ठाकरे सरकारला हे अतिक्रमण काढण्याची हिंमत झाली नाही, पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने अतिक्रमण हटविले याबद्दल आपण सरकारचे अभिनंदन करतो.

प्रतापगडावरील अतिक्रमण हटविण्यासाठी आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या विरोधात दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यासाठी आपण सरकारला विनंती करू, असेही ते म्हणाले. सातारा नगर परिषद निवडणुकीत भाजप व बाळासाहेबांची शिवसेना युती असेल व युतीचाच नगराध्यक्ष होईल. भाजपचे उमेदवार पक्षाच्या चिन्हावर लढतील व विजयी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ‘माजी सैनिकांची शारीरिक प्रशिक्षण प्रशिक्षकपदी नेमणूक करावी’

**मुंबई : प्रतिनिधी**

माजी सैनिकांचे देशाच्या सुरक्षेसाठीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी प्राथमिक शाळांमध्ये शारीरिक प्रशिक्षण प्रशिक्षकपदी नेमणूक करावी. पात्र माजी सैनिकांना एक वर्षाचे क्रीडा आणि शारीरिक शिक्षणाचे विशेष प्रशिक्षण द्यावे, असे निर्देश शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिले.

शिक्षण विभागातील माजी सैनिक व शहीद सैनिक कुटुंबियांच्या समस्या व शिक्षक भरतीमध्ये माजी व शहीद सैनिकांच्या कुटुंबियांच्या मागण्यांबाबत शुक्रवारी (दि. ११) जवाहरलाल बालभवन येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मंत्री केसरकर बोलत होते.

मंत्री केसरकर म्हणाले की, माजी सैनिकांचे सैन्यातील कामाचे स्वरूप पाहता ते शारीरिक शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना उत्तम प्रशिक्षण देऊ शकतील. त्यांच्यासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत पात्र सैनिकांना शारीरिक प्रशिक्षण प्रशिक्षक पदी सामावून घेण्याची प्रक्रिया राबवावी. शासकीय सैनिकी शाळेप्रमाणे खायगी शाळेतही अभ्यासक्रम व प्रशासकीय व्यवस्था असावी यासाठी सैनिक स्कूल समितीमध्ये फेरबदल करून शासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती गठीत करावी, असेही ते म्हणाले.

# सीवूड्स येथील घरांच्या दुरुस्तीची कामे पुन्हा सुरू

## माजी नगरसेवक भरत जाधव यांच्या प्रयत्नांना यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीवूड्स येथील सिडकोनिर्मित इमारतीच्या घरांची पडझड सुरूच होती. सिडकोने दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या दुरूस्तीचे काम वर्षभरापासून मुदत संपल्याचे कारण देत थांबवल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत होता. माजी नगरसेवक भरत जाधव यांनी स्थानिक रहिवाशांना सोबत घेऊन दुरूस्तीचे काम सिडकोने पुन्हा सुरू करावे यासाठी पाठपुरावा सुरू केला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून शुक्रवारी (दि. ११) पासून सिडकोने दुरुस्तीचे काम सुरू केले आहे.

सीवूड्समधील सेक्टर ४८, ४८ए आणि ४६मध्ये एकूण ३२ सिडकोनिर्मित हौसिंग गृहनिर्माण सोसायट्या आहेत. या इमारतींच्या स्लॅबचे प्लास्टर वारंवार कोसळल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मागील वर्षभरापासून सिडको मुदत संपल्याचे कारण पुढे करीत दुरुस्तीचे काम करीत नव्हती.



याबाबत भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव यांनी सिडकोविरोधात आवाज उठवत इमारतींच्या दुरूस्तीसाठी पाठपुरावा केला. त्यानंतर गुरुवारी (दि. १०) सिडकोने तक्रारींची दखल घेत मुख्य अभियंता गोडबोले यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ अभियंता राठोड आणि पथकाने दुर्घटनाग्रस्त सदनिकांची पाहणी केली आणि तातडीने शुक्रवारी (दि. ११) सदनिका दुरुस्तीची कामे पुन्हा सुरू केली असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

# बेलापूर येथे एमपीएससी मुख्यालयाला मंजुरी

## स्टुडंट्स असोसिएशनने मानले आमदार निरंजन डावखरे यांचे आभार

**ठाणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) मुख्यालयाच्या बेलापूर येथील स्वतंत्र इमारतीला जागा मिळविण्याबरोबरच राज्य सरकारकडून २८२ कोटी रुपयांच्या मंजुरीसाठी प्रयत्न केल्याबद्दल स्टुडंट्स राईट्स असोसिएशनने कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपचे आमदार निरंजन डावखरे यांचे आभार मानले आहेत. असोसिएशनचे पदाधिकारी महेश बडे यांनी डावखरे यांची शुक्रवारी (दि. ११) भेट घेतली.



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विविध पदांसाठी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांमध्ये लाखो विद्यार्थी सहभागी होतात, मात्र वर्षानुवर्षे लोकसेवा आयोगाच्या मुख्यालयासाठी स्वतंत्र जागा नव्हती. विक्रीकर विभागाच्या माझगाव येथील तीन मजल्यांवरून, तर फोर्ट येथील एका इमारतीच्या एका मजल्यावरून आयोगाचा कारभार सुरू होता. या प्रश्नावर स्टुडंट्स राईट्स असोसिएशनचे पदाधिकारी महेश बडे व किरण निंभोरे यांनी आमदार निरंजन डावखरे यांच्याकडे २०१८मध्ये संपर्क साधला होता, त्यावेळी कोकण भवन येथील मुख्यालयाशेजारील मोकळ्या भूखंडावर लोकसेवा आयोगाचे मुख्यालय उभारता येणार असल्याची सुचवून शासकीय यंत्रणांकडे पाठपुरावा सुरू केला होता.


विधान परिषदेतील २०१८मधील अधिवेशनात आमदार डावखरे यांनी एमपीएससीच्या मुख्यालयाचा प्रश्न मांडला होता. त्यानंतर राज्य सरकारकडून कार्यवाही सुरू करण्यात आली, मात्र काही तांत्रिक बाबी व परिपूर्ण मुख्यालयासाठी वाढीव खर्चाची तरतूद अपेक्षित होती. त्यामुळे मुख्यालयाला सुधारीत मान्यता मिळाली नव्हती. अखेर राज्य सरकारने नुकताच मुख्यालयासाठी २८२ कोटी २५ लाख रुपये खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाबद्दल आमदार डावखरे यांचे असोसिएशनच्या वतीने आभार मानण्यात आले. त्याचबरोबर लिपिक वर्गाच्या परीक्षा लोकसेवा आयोगामार्फत घेण्याच्या मागणीबाबत यशस्वी पाठपुरावा केल्याबद्दल आमदार डावखरे यांचे आभार मानून, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहण्याचे आवाहन केले.

# एका दिवसात ३३० दिव्यांगांना जागा व स्टॉलचे वाटप

**नवी मुंबई : बातशमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने दिव्यांगांना जागा व स्टॉल उपलब्ध करून देण्याकरिता सोडत शुक्रवारी (दि. ११) वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात काढण्यात आली. तीन टप्प्यात झालेल्या या सोडतीमध्ये तब्बल ३३० दिव्यांग व्यक्तींना सोडतीद्वारे स्टॉलचे वितरण करण्यात आले.

सोडतीनंतर अनेक दिव्यांग व्यक्तींनी समाधान व्यक्त करीत हा दिव्यांगांसाठी ऐतिहासिक



सुवर्णक्षण असल्याची भावना मांडत महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर व संबंधीत घटकांचे आभार मानले. सोडतीच्या प्रारंभी अतिरिक्त आयुक्त संजय काकडे यांनी संपूर्ण प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली.

सिडकोमार्फत स्टॉल या प्रयोजनासाठी राखीव ठेवलेले १४ भूखंड बाजारभावाने उपलब्ध करून घेण्यात आले. एकूण ३३० दिव्यांगाची जागा, स्टॉल वाटपाची सोडत झाली.

प्रथम फेरीमध्ये बेलापूर नऊ, नेरुळ १५, वाशी १६, तुर्भे १६, कोपरखैरणे १८, घणसोली २७, ऐरोली २४ व दिघा ११ अशा एकूण १३६ जागांचे वाटप करण्यात आले.

दुसऱ्या फेरीमध्ये बेलापूर दोन, नेरुळ ३९, वाशी २५, कोपरखैरणे सहा, घणसोली १६, ऐरोली २३ व दिघा सात अशा एकूण ११८ जागांचे वाटप करण्यात आले.

त्याचप्रमाणे तुर्भे व कोपरखैरणे येथे उपलब्ध जागांच्या संख्येपेक्षा अर्जदाराची संख्या जास्त असल्याने इतर विभागांमध्ये शिल्लक राहिलेल्या जागा एकत्रित करुन तिसऱ्या फेरीमध्ये तुर्भे ५९ व कोपरखैरणे १७ अशा ७६ जागांचे वाटप करण्यात आले. त्याचवेळी जागा वाटप झाल्याबाबतचे सूचनापत्र देण्यात आले. त्यामुळे दिव्यांग बांधवांनी समाधान व्यक्त करून आभार मानले.

## बाळासाहेबांची शिवसेना पनवेल उपमहानगरप्रमुखपदी डांगे

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे येथील अर्जुन डांगे यांची बाळासाहेबांच्या शिवसेनेमध्ये उपमहागरप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने त्याचबरोबर सचिव संजय मोरे आणि संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्या शिफारशीनुसार त्यांना हे पद देण्यात आले आहे. खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते डांगे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

पुणे जिल्हा आणि शिरूर तालुक्यातील मूळ रहिवासी असणारे अर्जुन डांगे हे कामोठ्यामध्ये स्थायिक झालेले आहेत. उद्योजक आणि वाहतूकदार म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. त्याचबरोबर वारकरी संप्रदायात काम करणाऱ्या डांगे यांना अध्यात्मिक अधिष्ठान आहे. दांडगा जनसंपर्क आणि सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारे स्थानिक नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांनी पदग्रहण केले. पक्षाने दिलेली जबाबदारी समर्थपणे सांभाळण्याच्या दृष्टिकोनातून नक्कीच प्रयत्न केले जातीलअशी प्रतिक्रिया अर्जुन डांगे यांनी दिली.

### दुखवटा

## राहुल इनकर

**पनवेल** : कामोठे येथील सामाजिक कार्यकर्त्या तसेच भाजप अनुसूचित जाती मोर्चा रायगड जिल्हा महिला चिटणीस ललिता राहुल इनकर यांचे पती राहुल नाथाजी इनकर यांचे गुरुवारी (दि. १०) मुंबई पोर्ट हॉस्पिटल येथे हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झाले. त्यांच्यावर शुक्रवारी (दि. ११) दुपारी कामोठे स्मशानभूमीत अंत्यस्कार करण्यात आले.



कामोठेमधील आंबेडकरी चळवळीतील क्रियाशील, सामाजिक बांधिलकी जपणारे, अजात शत्रु कार्यकर्ते राहुल नाथाजी इनकर हे मुंबई पोर्ट ट्रस्टच्या हॉस्पिटलमध्ये आरोग्य विभागात नोकरी करीत कर्तव्यावर असताना त्यांना दुपारी तीनच्या सुमारास अचानक हृदयविकाराचा झटका आल्यामुळे त्यांच्यावर तेथेच हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले, पण तेथील डॉक्टरांचे प्रयत्न यशस्वी न झाल्याने राहुल इनकर यांचे निधन झाले.

राहुल इनकर यांचा पुढील पुण्यानुमोदन (जलदान विधी) आणि शोकसभेचा कार्यक्रम बुधवारी (दि. १६) सकाळी १०.३० वा. तृतीया अपार्टमेंट, प्लॉट नं. ६, सेक्टर ६ कामोठे याठिकाणी होणार आहे.

## राष्ट्रीय मूल्यांकन, मानांकनविषयी परिषद

**मुंबई** : मुंबई विद्यापीठ येथे राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय मूल्यांकन आणि मानांकन या विषयावरील एकदिवसीय परिषद झाली. त्याचे उद्घाटन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झाले.

त्यावेळी त्यांनी, शिक्षण आणि शैक्षणिक गुणवत्ता ही देशाची आणि राज्याची ओळख असते. विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुरूप शिक्षणाबरोबरच त्यांचा आत्मविश्वास आणि आत्मगौरव वाढवणारे आणि त्यांना प्रगल्भ करणारे समाजोपयोगी शिक्षण दिले पाहिजे, असे प्रतिपादन केले.


**उरण नगरपरिषद, उरण**

**जिल्हा : रायगड**

**प्रथम संक्षिप्त ई-निविदा सूचना क्रमांक उनप/बांवि/७/२०२२-२३**

उरण नगरपरिषद क्षेत्रातील खालील कामांची संपूर्ण तपशिलासह सविस्तर ई-निविदा https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील मोरा पारकरवाडी जवळील स्मशानभूमीची सुधारणा व नुतनीकरण करणे. | रु. ३२,०९,३२०/- |

तरी अर्हता प्राप्त इच्छुक निविदाकारांनी दिनांक १३/११/२०२२ ते २८/११/२०२२ या कालावधीत वरील संकेतस्थळावर रितसर निविदा अपलोड करावी.

जा.क्र.उनप/बांवि/२७७४/२०२२-२०२३
दिनांक : ११/११/२०२२

सही/-
**मुख्याधिकारी**
उरण नगरपरिषद



**ॲड.निलेश द. हातमोडे**

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात**

क्रिमिनल एम.ए.नं.१२२९/२०२२

**श्री. तुकाराम पांडूरंग म्हात्रे,**
वय -३८ वर्षे, धंदा -शेती,
रा.मु.पो. केळवणे,
ता. पनवेल, जि रायगड } अर्जदार

**विरूध्द**

**ग्रामविकास अधिकारी**
ग्रामपंचायत केळवणे
ता. पनवेल जि रायगड } सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसाने असे कळवण्यात येते आहे की अर्जदार यांची आजी **कै. पोशीबाई पोशा म्हात्रे** ता. १०/०९/१९८९ रोजी मु.पो.केळवणे, ता. पनवेल जि. रायगड येथे मयत झालेले आहे. वरिल अर्जदार श्री. तुकाराम पांडूरंग म्हात्रे याची आजी **कै. पोशीबाई पोशा म्हात्रे** यांचे मृत्यु नोंदणी करण्यासाठी व मृत्यूदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत न्यायालयात दाखल करावी.

वरील पध्दतीची कोणतीही हरकत न दाखवल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यु नोंद होवून मृत्यु दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

येणेप्रमाण ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दि.११/११/२०२२ रोजी दिली

सही/-
कनिष्ठ लिपिक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक
फौजदारी न्यायालय पनवेल



**ॲड.निलेश द. हातमोडे**

**जाहीर नोटीस**

**पनवेल येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात**

क्रिमिनल एम.ए.नं.१२३९/२०२२
ने.ता १६/१२/२२

**श्री. सिना गणपत म्हात्रे**
वय -३८ वर्षे, धंदा -शेती,
रा, मु. पो. केळवणे,
ता. पनवेल, जि रायगड } अर्जदार

**विरूध्द**

**ग्रामविकास अधिकारी**
ग्रामपंचायत केळवणे
ता. पनवेल जि रायगड } सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसाने असे कळवण्यात येते आहे की अर्जदार यांची आजी कै. भिमाबाई बाळ्या म्हात्रे ता. ०७/०९/१९८० रोजी मु.पो.केळवणे, ता. पनवेल जि. रायगड येथे मयत झालेले आहे. वरिल अर्जदार श्री. सिना गणपत म्हात्रे याची आजी कै. भिमाबाई बाळ्या म्हात्रे यांचे मृत्यु नोंदणी करण्यसाठी व मृत्यूदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार असल्यास तशी लेखी हरकत हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत न्यायालयात दाखल करावी.

वरील पध्दतीची कोणतीही हरकत न दाखवल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यु नोंद होवून मृत्यु दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.
येणेप्रमाण ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दि.११/११/२०२२ रोजी दिली

सही/-
कनिष्ठ लिपिक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक
फौजदारी न्यायालय पनवेल

# खेरणे ग्रामपंचायतीत भाजपचे पर्व

## सरपंच शैलेश माळी, उपसरपंच राजेंद्र गोंधळी यांनी स्वीकारला पदभार



(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खेरणे ग्रामपंचायतीवर गेली २५ वर्षे शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व कायम होते. ते मोडीत काढत भारतीय जनता पक्षाचे कमळ फुलले असून सरपंचपदी भाजपचे शैलेश माळी विराजमान झाले आहेत.

सरपंच शैलेश माळी आणि उपसरपंच राजेंद्र गोंधळी यांनी शुक्रवारी (दि. ११) पदभार स्विकारला. त्याबद्दल भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देऊन सरपंच आणि उपसरपंचांचे अभिनंदन केले. या वेळी रॅली काढून जल्लोष केला.

या वेळी भाजपचे ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पंचायत समितीचे माजी सदस्य भुपेंद्र पाटील, शिवाजी दुर्गे, प्रकाश खैरे, उपसरपंच राजेंद्र अत्माराम गोंधळी, सतिश तांबडे, के. के. गोंधळी, के. एन. गोंधळी, प्रकाश खैरे, काशिनाथ माळी, बुथ अध्यक्ष रुपेश म्हात्रे, नायब तहसीलदार संभाजी शेलार, ग्रामसेविका प्रतिभा पुंडलिक वानखेडकर, मंडल आधिकारी संतोष कचरे, बुधाजी माळी, भास्कर माळी, अनिल गोंधळी, प्रदीप माळी, चंद्रकांत गोंधळी, रमेश माळी, नरेश माळी, रोहिदास पाटील, शनिवार पाटील, अरविंद गोंधळी, नामदेव पाटील, वासुदेव फडके, अरुण माळी, बाळाराम माळी, दिनेश गोंधळी, ज्ञानदेव गोंधळी, रामा माळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलकरांचा ’राम प्रहर’ संगीताच्या स्वरांनी दुमदुमला





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर अध्यक्ष असलेल्या कोशिश फाउंडेशनच्या वतीने बुधवारी (दि. ९) राजीव गांधी उद्यानात तर वडाळे तलाव परिसरात शुक्रवारी (दि. ११) सकाळी साडेसहा ते साडेसात या वेळेत संगीतमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामुळे पनवेलकरांचा ‘राम प्रहर’ संगीताच्या सुरांनी दुमदुमला.

परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमधील सांस्कृतिक वारसा जपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून बुधवारी आणि शुक्रवारी संगीतमय कार्यक्रम घेण्यात आला.

आठवड्याच्या प्रत्येक बुधवारी व शुक्रवारी संगीत कार्यक्रम घेण्याचा मानस कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष व माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केला असून त्याला पनवेलकरांची साथ लाभत आहे. रसिकांच्या आग्रहानुसार दिवस वाढवण्यात येणार आहेत.

# रोटरी क्लब ऑफ पनवेल होरायझनची मॅरेथॉन स्पर्धा

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार ध्वजांकन





(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : वार्ताहर**

अॅक्सेस टू डायबिटीस एज्युकेशन या घोषवाक्याखाली रोटरी क्लब ऑफ पनवेल होरायजनच्या माध्यमातून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ. गणेश हांडे यांनी शुक्रवारी (दि. ११) घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली. मॅरेथॉनचे ध्वजांकन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.

या वेळी स्वप्नील गांधी, ईशा शिंदे, अभिजित सावळेकर, विनीत परमार, दीपक परमार आदी उपस्थित होते.

डॉ. गणेश हांडे यांनी सांगितले की, १४ नोव्हेंबर हा दिवस जागतिक मधुमेह दिन म्हणून जगभरामध्ये साजरा केला जातो. मधुमेहाविषयी जनजागृती निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करीत आहोत. त्यामुळेच रोटरी क्लब पनवेल होरायझन व डायबिटीस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबलच्या वतीने रविवारी (दि. १३) नवीन पनवेल डी मार्ट समोरील मैदानात मॅरेथॉन आयोजित केली आहे. ही मेरेथॉन दोन गटात होणार आहे, तसेच मॅरेथॉन रनच्या दिवशी आम्ही लोकांना डोनेशनसाठी आवाहन केलेले आहे. डोनेशनमधून येणाऱ्या रकमेचा उपयोग डायबिटीस हेल्थ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टकडून इन्सुलिन बँक उभारणीसाठी केला जाईल.

मॅरेथॉनची सुरुवात रविवारी सकाळी साडेसहा वाजता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते ध्वजांकन करून होईल. मॅरेथॉनमध्ये प्रथम, द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या स्पर्धकांना बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होईल, अशी माहिती या वेळी देण्यात आली.



**पनवेल : धाकटा खांदा येथे भाजपच्या गुलाब डोंगरे परिवाराच्या कुलदैवत मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त शुक्रवारी श्री सत्यनारायण महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, तालुका सरचिटणीस लीना पाटील, गुलाब डोंगरे, विद्या डोंगरे आणि ग्रामस्थ मंडळ उपस्थित होते. या वेळी रत्नप्रभा घरत यांचे डोंगरे परिवारातर्फे स्वागत करण्यात आले.**

# राम रतन आशियाना बीच रिसॉर्टचे आज आमदार महेश बालदी यांच्या हस्ते उद्घाटन

**उरण : वार्ताहर**

नागाव येथील अंबिका वाडी स्वामी जीवनमुक्त स्वामी महाराज मठासमोर राम रतन आशियाना बीच रिसॉर्टचे उद्घाटन शनिवारी (दि. १२) सायंकाळी ५ वाजता आमदार महेश बालदी यांच्या हस्ते होणार आहे.

या वेळी राम सहतीया, रतन सहतिया, उरण नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुकाध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहर भाजप अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, नगरसेवक राजेश ठाकूर, उद्योजक राजा पडते, सांची राम सहतीया, मनोहर सहतिया, खुशी सहतीया, भव्यम सहतिया, रमेश सहतिया, महेंद्र सहतिया, चंदू सहतीया आदी उपस्थित राहणार आहेत.




# धामोळे शाळेत राष्ट्रीय शिक्षण दिन उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधन प्रेक्षाध्यान व जीवनविज्ञान तथा श्री जैन श्वेतांबर तेरापंथ महिला मंडल खारघर-बेलापूर शाखेच्या वतीने शुक्रवारी (दि. ११) धामोळे येथील राजिप शाळेत राष्ट्रीय शिक्षण दिवस साजरा करण्यात आला.

भाजप खारघर-तळोजे मंडल उपाध्यक्ष बीना गोगरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा



कार्यक्रम झाला. उपरोक्त संस्थांतर्फे राजिप शाळेला फळे, वह्या, चित्रकला वह्या इत्यादी शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी प्रार्थना व गाणी म्हणून त्याचप्रमाणे शाळेतील त्यांचे अनुभव सांगून पाहुण्यांसोबत हितगुज केले.

या वेळी बेलापूर तेरापंथी महिला मंडळच्या संयोजिका मंजु संचेती, प्रेक्षाध्यान प्रशिक्षिका मालती जैन व सुमिता दिवेकर, खारघर तेरापंथ महिला मंडळच्या माजी संयोजिका रेखा जैन उपस्थित होत्या. मुख्याध्यापक भालचंद्र पाटील यांनी पाहुण्यांचे आभार मानले.

# लेफ्टनंट ऑफिसर ऋचा दरेकर यांचा पनवेलमध्ये सत्कार

**पनवेल : वार्ताहर, प्रतिनिधी**

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतली जाणारी सीडीएस परिक्षा उत्तीर्ण करून त्यानंतर संबंधीत निवड प्रक्रियेतील सर्व टप्पेदेखील यशस्वीरित्या पार करून भारतीय लष्करात लेफ्टनंट ऑफिसर या पदावर ऋचा कृष्णकांत दरेकरची निवड झाली आहे. पनवेल शहरातील प्रथम महिला लेफ्टनंट ऑफिसर होण्याचा सन्मान तिने मिळविला आहे. तिच्या या कौतुकास्पद यशाबद्दल पनवेल महानगरपालिकेच्या वतीने तिचा नुकताच सन्मान करण्यात आला.

आयुक्त गणेश देशमुख यांच्या निर्देशानुसार शुक्रवारी (दि. ११) तिच्या घरी जाऊन महापालिका सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे यांच्या हस्ते सन्मानपत्र प्रदान करून सत्कार करण्यात आला. या वेळी विधी विभाग प्रमुख प्रियंका पाटील, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी उपस्थित होते.



ऋचाच्या या अभिमानास्पद कामगिरीमुळे तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे. ऋचाने तलवार बाजीत राष्ट्रीय स्तरावरदेखील नेतृत्व केले आहे. वडील कृष्णकांत दरेकर हे व्यावसायिक आहेत, तर आई अॅड. सुकन्या दरेकर या पनवेलमध्ये वकिली करतात. ऋचा हिचे आठवीपर्यंतचे शिक्षण खोपोली येथे शिशुमंदिरात झाले तर आठवी ते बारावीपर्यंतचे शिक्षण तिने पनवेल येथील बार्न्स हायस्कूलमध्ये घेतले. तिने जिल्हा व राज्य स्तरावर तलवारबाजी खेळामध्ये सुवर्णपदके मिळवली असून ती राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू आहे.

तिने रसायनी येथील पिल्लई कॉलेजमधून इलेक्ट्रॉनिक्स टेलिकम्युनिकेशन इंजिनियरिंगमधून केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतली जाणारी सीडीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढे एसएसबी मुलाखतीचा टप्पादेखील यशस्वीरित्या पार केला.

सहा हजार विद्यार्थी याठिकाणी मुलाखतीसाठी आले होते. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्या दृष्टिकोनातून तिने जोरदार तयारी केली होती. या प्रयत्नांना यश आले असून ऋचाच्या कामगिरीबद्दल पनवेलकरांची मान अभिमानाने उंचावली आहे.

# पनवेलमध्ये भरणार योजनांचा महामेळावा

**पनवेल : वार्ताहर**

राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल विधी सेवा समिती आणि पनवेल बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १३) पनवेलच्या वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विविध शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

या महामेळाव्याबाबत माहिती देण्यासाठी जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश जयराज वडणे यांनी पत्रकार परिषदेस संबोधित केले. या वेळी पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ उपस्थित होते. जयराज वडणे म्हणाले की, नागरिकांना लाभदायी ठरणाऱ्या १८ योजनांचे स्टॉल्स उभारण्यात आलेले असून ३१ ऑक्टोबरपासून हे अभियान सुरू झाले आहे. रविवारी या अभियानाची सांगता होत असून या वेळी प्रातिनिधीक स्वरूपात लाभार्थींना वाटप केले जाणार आहे.

या कार्यक्रमासाठी मुख्य जिल्हा न्यायाधीश सावंत, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त, पनवेल बार असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. मनोज भुजबळ यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. नागरिकांनी या योजनांच्या महामेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन या वेळी वडणे यांनी केले.



**पनवेल विधी सेवा समितीच्या वतीने सर्वांना न्याय मागण्याचा अधिकार प्राप्त व्हावा या उदात्त हेतूने तळोजा कारागृहात जाऊन तब्बल २,८७५ कैद्यांची एका प्रश्नावलीद्वारे मुलाखत घेऊन त्यांना कायदेविषयक मार्गदर्शन केले.**

**अॅड. मनोज भुजबळ, अध्यक्ष, पनवेल बार असोसिएशन**

**पनवेल विधी सेवा समितीने आदिवासी बांधवांच्या २५ प्रमुख व्यक्तींना कायदेविषयक मार्गदर्शन केले, तसेच त्यांच्या न्याय हक्कांचेबाबत त्यांना जागृत केले व त्यांच्यासाठी विशेषत्वाने असलेल्या कायद्यांची त्यांना जाणीव करून दिली. मला खात्री आहे की, हे २५ आदिवासी बांधव किमान अडीच हजार आदिवासींपर्यंत हे ज्ञान पोहचवून त्यांच्या अधिकारांची त्यांना जाणीव करून देतील.**

**-जयराज वडणे, जिल्हा न्यायाधीश-१**

# कळंबोलीतील उद्यानांची सफाई करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीमधील उद्यानामध्ये मोठ्या प्रमाणात झाडेझुडुपे वाढले आहेत. त्याचबरोबर गवत असल्याने या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांच्या मनामध्ये भय निर्माण होत आहे. या गार्डनची साफसफाई करण्यात यावी, अशी मागणी बाळासाहेबांच्या शिवसेनेचे शहर प्रमुख तुकाराम सरक यांनी केली आहे. याबाबत महापालिका प्रशासनाला पत्र व्यवहार करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कळंबोली वसाहतीमधील उद्यानाच्या देखभाल आणि डागडुजी करण्याकडे सिडकोने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. पावसाळ्यात या गार्डनमध्ये मोठ्या प्रमाणात गवत व झाडेझुडुपे वाढली आहेत. त्यामुळे उद्यानात सरपटणाऱ्या प्राण्यांचा वावर वाढला आहे.

या उद्यानात सकाळी अनेक कळंबोलीकर मॉर्निंग वॉकसाठी येतात. त्याचबरोबर संध्याकाळीसुद्धा फेरफटका मारण्यासाठी ज्येष्ठ नागरिकव लहान मुलेही खेण्यासाठी येत असतात. त्यामुळे उद्यानात साफसफाई करण्यात यावी, अशी मागणी तुकाराम सरक यांनी केली आहे.

## संपादकीय

# गुंडगिरीचे समर्थन कसे?

लोकशाही व्यवस्थेमध्ये मतभेदांचा आदर राखण्याची परंपरा असते. एखाद्या व्यक्तीचे किंवा पक्षाचे विचार पटत नसतील तर त्याला कडाडून विरोध करण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य भारतीय राज्य घटनेने सर्व नागरिकांना बहाल केले आहे, परंतु याचा अर्थ हिंसाचाराचा अवलंब करून थयथयाट करण्याचे स्वातंत्र्य संविधानाने दिले आहे असा होत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे नेमके हेच भान सुटले किंबहुना त्यांचे भान वारंवार सुटते असे आजवर दिसून आले आहे.

**काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या ‘हर हर महादेव’ या ऐतिहासिक चित्रपटाच्या आशयाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांनी गदारोळ करण्याचा प्रयत्न केला होता. या चित्रपटाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांचा आवाज आणि पाठबळ दोन्ही लाभले आहे. पावनखिंडीत अमर झालेल्या बाजीप्रभू देशपांडे यांची कहाणी सांगणाऱ्या या चित्रपटाला रसिक प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. बाजीप्रभूंनी सुरुवातीच्या काळात खुद्द शिवरायांशी झुंज दिल्याचे चित्रण ‘हर हर महादेव’ चित्रपटात करण्यात आले आहे. हे चित्रण अत्यंत चुकीचे असून इतिहासाला धरून नाही असा राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही नेत्यांचा दावा आहे. हा विरोध वैचारिक असता तर समजून घेण्याजोगे होते. इतिहासाचे पुनर्लेखन ही अव्याहत प्रक्रिया असते. काळानुरूप संशोधनामध्ये जसजशी भर पडत जाते तसतसा इतिहास थोडाफार बदलतो. ही प्रक्रिया घडणे केव्हाही स्वागतार्ह, पण या मतभेदांना जेव्हा गुंडगिरीचे स्वरूप येते तेव्हा त्याचे कुठल्याही परिस्थितीत समर्थन करता येत नाही. चित्रपट प्रदर्शित झाल्यानंतर ठाण्याच्या विवियाना मॉलमधील चित्रपटगृहात ‘हर हर महादेव’ या चित्रपटाचा खेळ सुरू असताना आमदार जितेंद्र आव्हाड आपल्या कार्यकर्त्यांसह तिथे घुसले व त्यांनी प्रेक्षकांना बाहेर जाण्यास फर्मावले. या प्रकारात काही प्रेक्षकांना मारहाणदेखील झाली असे दिसते. तेव्हा तेथे उपस्थित असलेल्या काही प्रेक्षकांनी खिशातील मोबाइल फोन काढून आमदार महोदयांचे हे वर्तन चित्रित केले. त्या व्हिडीओ क्लिप्स सध्या समाजमाध्यमांवर व्हायरल होताना दिसत आहेत. आमदार आव्हाड यांचे तेथील रौद्र रूप सर्वांना पहायला मिळाले. ते कोणालाही आवडणारे नव्हतेच. ठाण्यासारख्या सुसंस्कृत शहरात असे प्रकार घडणे निषेधार्ह आणि तितकेच निंदनीय आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ही कर्मभूमी आहे. आव्हाड यांच्याबाबत मारहाणीच्या तक्रारी नव्याने झालेल्या नाहीत. कुरमुसे नावाच्या एका अभियंत्याला बंगल्यावर बोलावून मारझोड करण्याची तक्रार यापूर्वी त्यांच्या विरोधात नोंदली गेली असून या संदर्भात महाविकास आघाडीचे मंत्री असताना त्यांना तांत्रिक स्वरुपाची अटकही झाली होती. या गुन्ह्याचा निकाल न्यायालयात अजून लागायचा आहे. गुंडगिरीच्या एका प्रकरणाला राजकीय आंदोलनाचे रूप देण्याचा प्रयत्न आमदार आव्हाड करीत असले तरी तो सफल होणे कठीण दिसते. सामान्य रसिक प्रेक्षकांना कुटुंबीयांसमवेत मारहाण किंवा धक्काबुक्की करण्यामध्ये कोणता पुरुषार्थ आहे हे आव्हाड आणि त्यांच्या समर्थकांनाच माहीत! या प्रकरणी आव्हाड यांना ठाण्यातील वर्तकनगर पोलीस ठाण्यात अटक करण्यात आल्यानंतर छत्रपतींच्या अवमानकारक चित्रणाला विरोध केल्याबद्दल अटक होत असल्यास आपण जामीनदेखील घेणार नाही असा बाणा आव्हाड यांनी दाखवला आहे. भावनिक राजकारणाच्या जोरावर वातावरण पेटवण्याचा हा प्रयत्न अश्लाघ्य मानावा लागेल. त्याचा समाचार घेण्यास न्यायालय समर्थ आहे.**

# रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जत्रांची रंगत



रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जत्रांचा हंगाम सुरू झाला आहे. शहरांमध्ये मनोरंजनाची अनेक साधने वर्षाच्या बाराही महिने उपलब्ध असतात. गाव-खेड्यात मात्र ठराविक काळात अशी रंगत असते आणि म्हणूनच जत्रा त्यांच्यासाठी खास ठरते.

खरीप हंगाम संपून शेतकऱ्यांचे सुगीचे दिवस सुरू झाले की वेध लागतात ते जत्रांचे. हल्ली निसर्गाचे चक्र बदलल्याने बळीराजाचे जगणे असह्य झाले आहे. यंदा तर वरुणराजा सरासरीपेक्षा जास्त बरसला, शिवाय त्याने आपला मुक्कामही वाढविल्याने शेतीचे नुकसान झाले. त्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाचविण्यासाठी शेतकरीवर्गाची तारांबळ उडाली होती. अखेर मळणी, झोडणीची कामे आटोपून अन्नदाता थोडीशी विश्रांती घेत आहे. त्याच्यासह कुटुंबीयांना जत्रा दोन घटका विरंगुळा देते. ग्रामीण भागात कष्टकऱ्यांसाठी आजही जत्रेचे आकर्षण कायम आहे. पेण-खोपोली मार्गावरील साजगावची जत्रा दोन वर्षांच्या कालावधीनंतर भरली आहे. कार्तिकी एकादशीपासून १५ दिवस चालणारी ही जिल्ह्यातील सर्वांत मोठी जत्रा मानली जाते.

जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ताकई देवस्थानच्या या विठ्ठल मंदिराची ओळख धाकटी पंढरी अशी आहे. सुमारे साडेतीनशे वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराज मिरचीचा व्यवसाय करीत असताना साजगाव येथील डोंगरावर येऊन पैशांची वसुली करण्यासाठी बोंब (हाक) मारीत असत. याच आख्यायिकेवरून येथील जत्रेला बोंबल्या विठोबाची जत्रा म्हणूनही ओळखले जाते. या जत्रेत राज्यभरातून असंख्य लोक येतात. जत्रेच्या निमित्ताने मिठाई, पाळणे आणि खेळण्यांची दुकाने तर असतातच, पण सुकी मच्छी, बैल व घोंगडी बाजार तसेच कृषीविषयक अवजारे ही साजगावच्या जत्रेची खास वैशिष्ट्ये आहेत. पूर्वी या जत्रेत महाराष्ट्राची लोककला अर्थात तमाशाचा फडही रंगत असे.



अमन तांबे, सुरेखा पुणेकर, काळू-बाळू आदी नामवंत कलाकार या ठिकाणी आपली कला सादर करीत असत, मात्र अलीकडच्या काळात तमाशाची जागा डान्स पार्टीने घेतली ही शोकांतिका म्हणावी लागेल. शिवाय लम्पी त्वचारोगाच्या पार्श्वभूमीवर या वर्षी बैलबाजार भरलेला नाही, पण सुक्या मच्छीचा घमघमाट दूरवरूनच येतोय. त्याचप्रमाणे गरमागरम जिलेबी यात्रेकरूंची रसना तृप्त करीत आहे.

साजगावच्या यात्रेनंतर अलिबाग तालुक्यातील आवास येथील नागेश्वरची यात्रा, मापगावची कनकेश्वरची यात्रा, वरसोलीची विठोबाची यात्रा तसेच डिसेंबर महिन्यात दत्त जयंतीनिमित्त चौल-भोवाळेची यात्रा सुरू होते. पुढे एकविरा देवीचा यात्रा उत्सव झाल्यानंतर अनेक गावांमध्ये ग्रामदेवतांच्या जत्रा भरतात. हा हंगाम उन्हाळ्यापर्यंत चालतो. यातून



मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते आणि स्थानिकांना रोजगारदेखील मिळतो.

जत्रेला ग्रामीण भागात वेगळे स्थान आहे. लोकांच्या मनाला आनंद देणारा हा लोकोत्सव आहे, असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. या निमित्ताने सगे-सोयरे, पै-पाहुणे, मित्रमंडळी आवर्जून एकत्र येतात. बच्चेकंपनीसाठी तर जत्रा म्हणजे पर्वणीच असते. जत्रेत काय घेऊ नि काय नाही असे त्यांना होऊन जाते. मग लहानग्यांसोबत मोठी मंडळीही लहान होत धम्माल करतात. सरतेशेवटी जत्रा संपते, पण आठवणी आणि ऊर्जा वर्षभरासाठी देऊन जाते.

**-समाधान पाटील, पनवेल**

## शहरांमध्ये महोत्सवांची धूम

ग्रामीण भागांमध्ये जत्रांचा हंगाम सुरू झालेला असताना दुसरीकडे शहरांमध्ये सांस्कृतिक महोत्सव रंगू लागले आहेत.

साधारणपणे मुलांच्या सहामाही परीक्षा संपल्या की विविध महोत्सव आयोजित केले जातात. यामधून संस्कृती आणि कलेचे जतन, संवर्धन केले जाते. विशेष म्हणजे याद्वारे स्थानिक मुलांच्या कलागुणांना वाव मिळतो आणि त्यांना व्यासपीठ उपलब्ध होते. महोत्सवांमध्ये करमणुकीची साधने तसेच जिभेचे चोचले पुरविण्यासाठी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्सदेखील असतात. मनोरंजन आणि पेटपूजा एकाच ठिकाणी होत असल्याने संपूर्ण कुटुंबाची पावले महोत्सवाकडे वळतात.

पेणमध्ये स्वररंग आयोजित पेण फेस्टिवल नुकताच रंगला. झेंडा सामाजिक संस्था आणि कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने कामोठे येथे आगरी-कराडी कामोठ्याचा महोत्सव भरविण्यात आला आहे. तेथे ४ ते १३ नोव्हेंबर असे दहा दिवस मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि स्पर्धा होत आहेत. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने नवीन पनवेलमध्ये मल्हार महोत्सव आयोजित करण्यात येतो. सर्वांगसुंदर अशा या महोत्सवाची साऱ्यांनाच प्रतीक्षा असते, तर डिसेंबर महिन्याच्या शेवटी मुरूड जंजिरा पर्यटन महोत्सव साद घालतो.

याशिवाय जिल्ह्यात अनेक छोटे-मोठे महोत्सव नागरिकांना खुणावत असतात. थंडीच्या आल्हाददायक दिवसांत हे महोत्सव वातावरण आणखी सुखद करीत आहेत.





## बदलते तंत्रज्ञान

# इंटरनेटद्वारे होऊ शकतो तुमचा फोन हॅक; असे राहा सतर्क!

इंटरनेटमुळे आपले आयुष्य अधिक सोपे झाले आहे. आपण घरबसल्या इंटरनेटच्या मदतीने कोणतेही काम करू शकतो. बँकेचे व्यवहार, वेगवेगळी बिल्स भरणे, अगदी महिन्याचे राशनदेखील आपण मोबाईलमधून इंटरनेटच्या मदतीने मागवतो. त्यामुळे इंटेरनेटशिवाय कोणतेही काम करणे आजकाल अशक्य वाटते, पण अनेक कामांसाठी अवलंबून असणाऱ्या इंटरनेटमुळेच फोन हॅक होऊ शकतो आणि सायबर क्राईमचे शिकार होऊ शकतो हे अनेकांना माहीत नसते. सायबर क्राईमच्या जाळ्यापासून स्वतःचा बचाव करण्यासाठी इंटरनेट वापरताना काही गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे असते. कोणत्या आहेत त्या गोष्टी जाणून घ्या.




कुठेही फ्री वायफाय उपलब्ध असेल, तिथे सर्वजण स्वतःचा फोन वायफायला कनेक्ट करतात, मात्र यामुळे तुमचा वैयक्तिक डेटा दुसऱ्या फोनवर शेअर केला जाण्याची भीती असते. त्यामुळे फ्री वायफाय वापरणे टाळा.

मोबाईलवर दररोज असंख्य वेबसाईट्सचे नोटिफिकेशन येत असतात त्यातील काही वेबसाईट्स या तुम्ही सब्सक्राईब केलेल्या असतात, तर काही अनोळखी असतात. या अनोळखी वेबसाईटवर युजर आकर्षित करण्यासाठी वेगवेगळ्या ऑफर्स देण्यात येतात. त्यामुळे अधिक माहिती जाणून घेण्यासाठी अशा लिंक्सवर क्लिक केले जाते, पण या वेबसाईट्स विश्वासार्ह नसतात. यामुळे तुमचा फोन हॅक होण्याची शक्यता असते. म्हणून अनोळखी वेबसाईट्सवर क्लिक करणे टाळा.

अनेकांना पासवर्ड लक्षात ठेवण्याचे टेन्शन येते. त्यामुळे ते वेगवेगळ्या सोशल मीडिया अकाउंट्सना एकच पासवर्ड ठेवतात. असे केल्याने जर तुमचे एक अकाउंट हॅक झाले तर त्याबरोबर सर्वच अकाउंट हॅक होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक अकाउंटचा एकच पासवर्ड ठेवणे टाळा.


जर कधी तुमचा फोन कधी हॅक झाला तर तुमचा सर्व डेटा डिलीट होऊ शकतो. त्यामुळे इंटरनेट वापरण्यापूर्वी नेहमी बॅकअप ऑन करा. यामुळे तुमचा डेटा फोनमध्ये सेव्ह राहील.

एकंदर तुमचा फोन हॅक होऊ नये असे वाटत असेल तर काही गोष्टी काटेकोरपणे पाळा.

# लढाऊ समाजसेवक सेनापती बापट

**निमित्त**

सशस्त्र क्रांतिकारक, तत्त्वचिंतक व लढाऊ समाजसेवक पांडुरंग महादेव बापट अर्थात सेनापती बापट यांचे योगदान मोठे आहे. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेट्यात धरणग्रस्त गावे व शेतकऱ्यांकरिता बापट यांनी सत्याग्रहाचा लढा दिला. त्यामध्ये महाराष्ट्रातील जे शेकडो सत्याग्रही सामील झाले त्यांचे त्यांनी नेतृत्व केले. त्यामुळे ‘सेनापती बापट’ या शब्दावलीने ते ओळखले जाऊ लागले.



सेनापती बापट यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८८० रोजी अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर येथे गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांचे माध्यमिक आणि बीएपर्यंतचे उच्च शिक्षण मुख्यत्वेकरून पुणे येथे झाले. डेक्कन कॉलेजमध्ये सशस्त्र क्रांतीद्वारे भारत स्वतंत्र करण्याची शपथ तलवारीवर हात ठेवून घेतली. बीए परीक्षेत उत्तीर्ण झाल्यावर मुंबई विद्यापीठाचे शिष्यवृत्ती मिळवून ते इंग्लंडला गेले. एडिंबरो येथे इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये शिक्षण घेत असतानाच क्रांतिकारक विचारांचा प्रचार करीत असल्यामुळे शिष्यवृत्ती बंद होऊन शिक्षण अपुरे राहिले.

श्यामजी कृष्ण वर्मा या क्रांतिकारक नेत्याशी परिचय होऊन त्यांच्या मदतीने पॅरिस येथे राहून तेथील रशियन क्रांतिकारकांकडून बापट यांनी प्रचंड स्फोटक बॉम्बची तंत्रविद्या हस्तगत केली. त्या तंत्रविद्येची पुस्तिका भारतात व बंगालमधील क्रांतिकारक गटांपर्यंत पोहचविली. क्रांतिकारकांच्या कटाच्या एका खटल्यात माफीच्या साक्षीदाराने बापटांचे नाव उघडकीस आणल्यामुळे बापट हे १९८ ते १९१२पर्यंत चार वर्षे अज्ञातवासात राहिले. नंतर १९२१पर्यंत स्वत:च्या जन्मगावी शिक्षक म्हणून राहिले आणि समाजसेवेचे व्रत घेतले.

पहाटे उठल्याबरोबर गावचे रस्ते झाडणे व शौचकूप साफ करणे हे व्रत बापट यांनी जन्मभर स्वीकारले. १९२१ ते १९२४ या कालखंडात पुणे जिल्ह्यातील मुळशी पेटा येथील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जमीन मिळविण्याकरिता सत्याग्रहाचे आंदोलन चालविले. या आंदोलनात कारागृहवासाची तीनदा शिक्षा त्यांना झाली. शेवटची सात वर्षे सक्तमजुरीची होती. राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये भाग घेत असताना राजद्रोहात्मक भाषणे केल्याबद्दल अनेकदा अनेक वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली.

संस्थांनी प्रजांच्या हक्कांकरिता चालू असलेल्या आंदोलनात भाग घेऊन संस्थानाच्या प्रवेशबंद्या त्यांनी मोडल्या, त्याबद्दल कारागृहवासही सोसला. स्वातंत्र्योत्तरकाळातही भाववाढविरोधी आंदोलन, गोवामुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन इ. आंदोलनांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. आंदोलन करीत असताना कारागृहात आंदोलनाला पूरक अशा तऱ्हेचे साहित्य लिहिले व ते प्रकाशित केले. त्यांनी अपुरे राहिलेले छोटेसे आत्मचरित्र लिहिले आहे. बरेचसे लेखन मराठीत व थोडे इंग्रजीत व संस्कृतमध्ये केले, क्रांतिवादी राजकारणाचे समर्थन करणारे, भगवतगीतेच्या तत्त्वज्ञानावर आधारलेले, राष्ट्रमुक्ती व अन्याय प्रतिकार या दोन मुद्यांना अनुसरून युक्तिवाद केलेले हे साहित्य आहे. चैतन्यगाथा हे पुस्तक वाचले म्हणजे त्यांचे मूलभूत विचार लक्षात येतात. मराठीमध्ये योगी अरविंदांच्या इंग्लिशमधील आध्यात्मिक तत्त्वज्ञानावरील ग्रंथांचा उत्कृष्ट अनुवाद बापटांनी केला आहे. अरविंदांचा दिव्यजीवन हा मोठा ग्रंथ बापटांनी प्रसन्न शैलीने मराठीत उतरविला आहे. त्यांचे साहित्य समग्र ग्रंथ (१९७७) म्हणून साहित्य व संस्कृती मंडळाच्या अनुदानाने प्रसिद्ध झाले आहे. २८ नोव्हेंबर १९६७ रोजी त्यांचे देहवसान झाले.

**क्लिक...क्लिक...!**



**सुधागड : धुक्याची दाट चादर पसरल्याने दिवस उगवल्यानंतरही काही अंतरावरील स्पष्टपणे दिसत नसल्यामुळे वाकण-पाली-खोपोली मार्गावरील वाहतुकीचा वेग सकाळी मंदावला होता.** (छाया : गौसखान पठाण)

## आरोग्य प्रहर

# हिवाळ्यात ‘या’ पदार्थांचा करा आहारात समावेश!

हिवाळ्याचा आनंद लुटण्याची गुरुकिल्ली निरोगी आहार, रोजचा व्यायाम आणि योग्य झोप आहे. हिवाळ्यात फक्त उबदार कपडे घालणे पुरेसे नाही, तर आपल्याला आहारात काही गोष्टी समाविष्ट करणे आवश्यक आहे, ज्यामुळे आपले शरीर उबदार राहील आणि रोगप्रतिकार शक्ती वाढेल.



मानवी शरीरात पोषक तत्त्वे खूप महत्त्वाची भूमिका बजावतात. या दिवसांमध्ये शरीराला उष्मांक मिळण्यासाठी काही ठराविक अन्नघटकांची गरज असते. खजूर हे पोषक तत्त्वांच्या कॅप्सूलसारखे असतात आणि ज्यांना स्वतःला तंदुरुस्त ठेवायचे असते त्यांच्यासाठी ते फायदेशीर असते. खजूरमधील कमी चरबीयुक्त सामग्री तुमचे वजन नियंत्रित ठेवते आणि त्याचवेळी शरीराला आवश्यक पोषक तत्त्वांचा पुरवठा करते.

चरबी, प्रथिने आणि फायबर समृद्ध, हे मानव-अनुकूल बिया आपल्या शरीरासाठी लोहाचे सर्वोत्तम स्त्रोत आहेत. हे ग्लूटेन-मुक्त छद्म-धान्य फॉस्फरसच्या उच्च सामग्रीसह अत्यंत पौष्टिक आहे, ज्याच्या नियमित सेवनाने तुम्हाला मजबूत हाडे मिळतात आणि त्यामुळे सुस्ती तुमच्यापासून दूर राहते.

कमी-कॅलरी पॅकेजमध्ये भरपूर पोषक तत्वांनी युक्त, पालक, कॉलर्ड्स, मोहरीच्या हिरव्या भाज्या आणि एस्कॅरोल सारख्या गडद पालेभाज्या हिवाळ्याच्या हंगामात त्यांची मुळे तसेच पाने पसरतात जेव्हा इतर अनेक भाज्या दुर्मिळ होतात. इतर विविध पोषक तत्त्वांनी समृद्ध ही पाने केवळ आपल्या हाडांचे आरोग्य सुधारत नाहीत, तर हिवाळ्याच्या हंगामात सामान्यतः आपल्या उग्र त्वचा आणि केसांच्या समस्यांवर उपायदेखील बनतात.

सुका मेवा, बदाम आणि अक्रोड यांच्या कुळात अत्यंत आदरणीय असलेले हे फळ केवळ तुमचे शरीर उबदार ठेवत नाही तर सक्रिय मज्जासंस्था, निरोगी हृदय आणि इब्सुलिनची सुधारित संवेदनशीलतादेखील सुनिश्चित करतात. ते अनेक आनंददायी थंडीचे दिवस आणि संध्याकाळ देऊ शकतात.

मासे आणि अंडी, प्रथिने आणि कर्बोदकांमधे समृद्ध असताना, व्हिटॅमिन बी १२चे समृद्ध स्त्रोत आहेत जे निरोगी रोगप्रतिकारक शक्ती सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहे. ते थकवा आणि तणाव कमी करण्यातदेखील मदत करतात. त्यामुळे तुमचे शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुनिश्चित होते. हिवाळ्यात सीफूड खाल्ल्याने हृदयविकाराचा झटका आणि पक्षाघात टाळता येतो. हे रक्तदाब कमी करू शकते आणि हृदयविकाराचा धोका कमी करू शकते.

# काँग्रेसच्या सतीश जारकिवलींवर कारवाई करा

## भाजप युवा मोर्चाची रोहा तहसीलदारांकडे मागणी



**धाटाव : प्रतिनिधी**

हिंदूबद्दल चुकीचे व बेताल वक्तव्य करणाऱ्या काँग्रेस नेते सतीश जारकिवली यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शुक्रवारी (दि. ११) भाजप युवामोर्चाने रोह्याच्या तहसीलदार कविता जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

कर्नाटक प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष सतीश जारकिवली यांनी हिंदू शब्दाबद्दल चुकीचे व बेताल वक्तव्य केल्यामुळे वाद निर्माण झाला आहे. अशा बेताल वक्तव्य करणाऱ्या काँग्रेस नेत्याविरुद्ध भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली व दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग यांच्या सूचनेनुसार रोहा तालुका युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी जाहीर निषेध व्यक्त केला तसेच रोहा तहसीलदार कविता जाधव यांना निवेदन दिले. सतीश जारकिवली यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हा चिटणीस नरेश कोकरे, रोहा तालुका अध्यक्ष महेश ठाकूर, तालुका सरचिटणीस संजय लोटणकर, अविनाश काणेकर, रोहा शहर अध्यक्ष निलेश धुमाळ, धाटाव विभाग अध्यक्ष कृष्णा बामणे, सोशल मीडिया संयोजक संनिल इंगावले यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



# खालापुरात कार्बन प्रदुषणाच्या प्रमाणात वाढ

## प्रदूषण नियंत्रण मंडळ सुस्त

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील कारखानदारी जरी रोजगार निर्मिती करत असली, तरी काही कारखाने नियम पायदळी तुडवत असल्याने, वायू व जलप्रदूषणाच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे. हवेतील प्रदूषण नागरिकांच्या जीववर उठत असून आमदार महेश बालदी यांनी कार्बन कारखाना प्रदूषण मुद्द्यावर आवाजदेखील उठवला होता.

कार्बन कारखान्यावर कोणताही अंकुश नसल्याने, प्रदूषण करत आहेत. अनेक कारखाने रात्रीच्या वेळेस मोठ्या प्रमाणात हवेत घातक वायू सोडत असल्याने नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे.

खालापूर तालुक्यात पाताळगंगा, पेण-खोपोली मार्गावर तांबाटी, साजगाव, ढेकू, कुंभिवली, सावरोली व धामणी परिसरात मोठ्या प्रमाणात कारखानदारी आहे. सावरोली-खारपाडा राज्यमार्गावर सावरोली, कुंभिवली परिसरातील अनेक कारखाने नियमांचे पालन करत नसल्याचे अनेकदा उघडकीस आले आहे. रसायनयुक्त पाणी नदीपात्रात, ओढ्यात सोडणे तसेच कार्बन व घातक वायू उत्सर्जन मोठ्या प्रमाणात करतात. सध्या थंडीची सुरवात असून पडणाऱ्या धुक्यात कारखाने बेमालूमपणे घातक वायू तसेच प्रदूषणकारी कार्बन मोठ्या प्रमाणात सोडत आहेत. कार्बन उत्पादन करणाऱ्या कारखाना परिसरातील जलसाठे, वृक्षांवरदेखील मोठ्या प्रमाणात कार्बन जमा झालेला आढळत आहे. या कारखान्यातील कामगारांना सुरक्षा साधने पुरविण्यात येत नसल्याने, कामावरून घरी परतताना कामगार नखशिखांत कार्बनमध्ये माखलेला असतो. गाव आणि वस्तीलगत असलेले हे कारखाने मानवी आरोग्याशी खेळत असून, प्रदूषण नियंत्रण मंडळ मात्र सुस्त असल्याने कोणतीही कारवाई होत नाही.

### प्रक्रियेविना थेट नदीपात्रात पाणी

**अनेक कारखान्यातील सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच ते थेट नदीपात्रात सोडले जाते. शिवाय रात्रीच्या वेळी घातक वायू हवेत सोडला जातो. योग्य ती काळजी न घेता अकुशल कामगार धोकादायक रसायने हाताळताना अनेक कारखान्यात दुर्घटना घडल्या आहेत. शिवाय सुरक्षा अधिकारी हे पददेखील कारखान्यात नसल्याने सुरक्षिततेच्या कोणत्याही उपाययोजना केल्या जात नाहीत. मध्यंतरी माडप हद्दीतील सिलिंडर कंपनीत धोकादायक पद्धतीने सुरू असलेले काम पोलिसांनी छापा टाकून थांबवले होते. या प्रकरणी कारखाना व्यवस्थापकास अटक करून गुन्हा दाखल करण्यात आला होता.**

# रायगड वाहतूक पोलिसांनी खोपोलीत विद्यार्थ्यांशी साधला संवाद



**खोपोली : प्रतिनिधी**

पोलीस हा शिक्षा देणारा क्रुर माणूस असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये असल्यामुळे कुमारवायात एखादा गुन्हा घडल्यास भितीपोटी घरसोडून जाणे किंवा आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीत असतात.विद्यार्थ्यांमध्ये पोलीस दादा आपला मित्रच असल्याची भावना सांगण्यासाठी तसेच आई-वडील आपले मित्र आहेत त्यांच्याशी दिलखुलास बोला, यासंबंधीची जनजागृती करण्यासाठी रायगड वाहतूक पोलिसांनी शुक्रवारी खोपोली नगरपालिकेच्या वासरंग शाळेत विद्यार्थ्यांशी संवाद साधून मार्गदर्शन केले.

वासरंग शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी रायगड जिल्हा वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुवर्णा पत्की, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव, हवालदार संजय सताणे, शिपाई प्रविण रणमिळे, धीरज तुपे, हवालदार झेमसे, शाळेच्या मुख्याध्यापिका भोसले आदि उपस्थित होते.

समोरच्याला माणूस म्हणून महत्त्व देत आपण माणूस म्हणून काम करत रहा, बऱ्याचशा गोष्टी वाईट मार्गाकडे चालल्या आहेत हे न करता आपण सतर्क नागरिक बनलं पाहिजे, असा सल्ला वरिष्ठ पोलीस निरिक्षक सुवर्णा पत्की यांनी या वेळी दिला.

आजकाल फक्त मुलींवरच अत्याचार होतात असे नाही, मुलांवरही अत्याचार होतात, अशी खंत व्यक्त करीत पत्की यांनी, आपण आपलं संरक्षण केलं पाहिजे, तुम्हांला हात-पाय चालवता आले पाहिजेत. आई-वडिलांना चांगले मित्र समजले पाहिजे, असे सांगितले.

वाहतुकीचे नियम पाळले पाहिजेत, १८ वर्ष झाल्यावरच गाडी चालवली पाहिजे, प्रत्येक व्यक्तींमध्ये एक पोलीस आहे, तुम्हाला तुमच्या कर्तव्याची जाणीव असली पाहिजे, तुमच्या हातून कुठलीही चूक झाली तर तुम्ही ती तुमच्या जवळच्या व्यक्तीला सांगितली पाहिजे, सायबर क्राईमपासून सावध राहा, असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव यांनी केले. आई-वडीलांना सर्व गोष्टी सांगा, पोलीस दादा, ताई आपले मित्र आहेत, असेही जाधव यांनी सांगितले.

# आश्वासनानंतर सहा आसनी रिक्षाचालकांचे आंदोलन स्थगित

**अलिबाग : प्रतिनिधी**




सहा आसनी रिक्षाचालकांच्या प्रलंबित मागण्यासंदर्भात येत्या दोन-चार दिवसांत बैठक घेण्यात येईल, या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आश्वासनानंतर सहा आसनी रिक्षाचालकांनी रायगड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरु केलेले आंदोलन स्थगित करण्यात आले. आमदार महेंद्र दळवी यांच्या मध्यस्तीनंतर आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा या वेळी विजय पाटील यांनी केली.

जुन्या तीन आसनी रिक्षांची वयोमर्यादा वाढवून द्यावी, स्क्रॅप झालेल्या रिक्षांच्या जागी चार चाकी सीएनजी इंधनावरील वाहने वापरण्यास मान्यता द्यावी, कोरोनाकाळात तीन चाकी रिक्षा चालकांना शासनाने दिलेले दिड हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान सहा आसनी रिक्षा चालकांनाही द्यावे, रिक्षा आणि टॅक्सी हस्तांतरण परवान्यातील शुल्क कपात करण्यात यावी, पंधरा वर्षांवरील वाहनांना पर्यावरण कर घेताना आकारण्यात येणारा विलंब कर विशेष बाब म्हणून माफ करण्यात यावा, मीटर टॅक्सीला जिल्ह्याबाहेर जाण्यासाठी ऑनलाइन परवान्याची व्यवस्था करावी, जिल्ह्यातील सर्व तालुक्यात सहा आसनी रिक्षाचालक आणि टॅक्सी यांना परवानगी असावी, विनापरवाना अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करावी, टेरीफ कार्डचे वाढीव दरपत्रक मिळावे, संगणक प्रणालीत सुधारणा व्हावी आदि मागण्यासाठी रायगड जिल्हा विक्रम मिनिडोअर चालक मालक संघटनेने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण आंदोलनाला सुरवात केली होती.

उपोषणाच्या दुसऱ्या दिवशी जिल्ह्यातील सर्व सहा आसनी रिक्षा बंद ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे प्रामुख्याने ग्रामिण भागातील प्रवाशांचे हाल होत होते. त्यामुळे शुक्रवारी अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांनी आंदोलकांची भेट घेतली. आंदोलकांशी चर्चा केली. यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आंदोलकांशी बोलणे करून दिले. दोन-चार दिवसांत सहा आसनी रिक्षाचालकांच्या प्रश्नासंदर्भात बैठक लावतो, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी आंदोलकांना दिले. यानंतर हे आंदोलन स्थगित झाले.

# शिवप्रताप दिनानिमित्त कर्जतमध्ये झाली इतिहासाची उजळणी



**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना कर्जत विधानसभा विभागाच्या वतीने गुरुवारी (दि. १०) शिवप्रताप दिन साजरा करण्यात आला. या सोहळ्यात अफजल खानाचा वध पोवाडा व व्याख्यानाच्या माध्यमातून उभा केला. या वेळी कर्जतचा माहीत नसलेला इतिहासही व्याख्यात्यांनी सादर करून इतिहासाची उजळणी केली.

कर्जतच्या लोकमान्य टिळक चौकामध्ये शिवप्रताप दिनाचे आयोजन करण्यात आले होते. मनसेच जिल्हाध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन केले. जिल्हा सचिव जे. पी. पाटील, उपजिल्हाध्यक्ष सचिन कर्णुक, विधानसभा सचिव धनंजय दुर्गे, तालुकाध्यक्ष महेंद्र निगुडकर, महिला जिल्हाध्यक्ष सपना राऊत, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रसन्न बनसोडे, शहराध्यक्ष समीर चव्हाण, नगरसेवक हेमंत ठाणगे आदी उपस्थित होते.

महेंद्र निगुडकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. जितेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर शिवशाहीर वैभव घरत व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोवाडा सादर करून वातावरण निर्मिती केली. शिवव्याख्याते ॲड. रवींद्र यादव यांनी आपल्या व्याख्यानात प्रताप गडावरील रणसंग्राम उभा केला. त्यानंतर अनेकांना माहीत नसलेला कर्जतचा इतिहास सादर करण्यात आला. त्यामुळे इतिहासाची उजळणी झाल्याचा अनुभव अनेकांना आला. सई भोसले या विद्यार्थिनीने शिवाजी महाराजांचा प्रतापगडावरील एक प्रसंग कथन केला. सूत्रसंचालन संदीप बोराडे यांनी केले.

विकास चित्ते, सुनील साठे, महेंद्र कर्वे, साईनाथ श्रीखंडे, विशाल जोशी, अभिषेक दर्गे, महेश सोगे, संजय तन्ना, सतीश येरुणकर, चिन्मय बडेकर , प्रज्योत घोसाळकर, यशवंत भवारे, मिलिंद मिसाळ, नाना खेडेकर, हरेश्वर भोईर, समीर सुर्वे, दिनेश बोराडे, हेमंत चव्हाण, सुभाष नाईक, सागर भोईर, तेजश्री भोईर यांच्यासह शिवप्रेमी नागरिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲड.निलेश द. हातमोडे

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात**

क्रिमिनल एम.ए.नं.१२३०/२०२२
ने.ता १६/१२/२२

**श्री. तुकाराम पांडुरंग म्हात्रे**
वय -५० वर्षे, धंदा-शेती,
रा, मु. पो. केळवणे
ता. पनवेल, जि रायगड
} अर्जदार

**विरूध्द**

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत केळवणे
ता. पनवेल जि रायगड
} सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळवण्यात येते आहे की अर्जदार यांची आजी **कै. पार्वती पांडुरंग म्हात्रे** ह्या ता. २६/०६/२०२२ रोजी मु.पो. केळवणे ता. पनवेल जि. रायगड येथे मयत झालेले आहे. वरिल अर्जदार श्री. तुकाराम पांडुरंग म्हात्रे यांची आजी **कै. पार्वती पांडुरंग म्हात्रे** यांचे मृत्यु नोंदणी करण्यासाठी व मृत्यूदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार असल्यास तशी लेखी हरकत हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत न्यायालयात दाखल करावी.

वरील पध्दतीची कोणतीही हरकत न दाखवल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यु नोंद होवून मृत्यु दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.
येणेप्रमाण ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दि.११/११/२०२२ रोजी दिली

सही/-
कनिष्ठ लिपिक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक
फौजदारी न्यायालय पनवेल

ॲड.निलेश द. हातमोडे

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो यांचे कोर्टात**

क्रिमिनल एम.ए.नं.१२६०/२०२२
ने.ता १६/१२/२२

**श्री. मारुती रामा पाटील**
वय -५९ वर्षे, धंदा-शेती,
रा, मु. चिंध्रण, पो. देविचाडा
ता. पनवेल, जि रायगड
} अर्जदार

**विरूध्द**

**प्रभाग समिती अ प्रभाग अधिकारी**
पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल जि रायगड
} सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळवण्यात येते आहे की अर्जदार यांची आजी **कै. हाली हाशा फडके** ह्या दि. १०/१२/१९७८ रोजी रा.मु.पो. देविचापाडा ता. पनवेल जि. रायगड येथे मयत झालेले आहे. वरिल अर्जदार श्री. मारुती रामा पाटील यांची आजी **कै. हाली हाशा फडके** यांचे मृत्यु नोंदणी करण्यासाठी व मृत्यूदाखला मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले आहे. तरी सदर अर्जाबाबत इतर कोणाचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तकार असल्यास तशी लेखी हरकत हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत न्यायालयात दाखल करावी.

वरील पध्दतीची कोणतीही हरकत न दाखवल्यास सदरहू अर्जदारांच्या मागणीनुसार मृत्यु नोंद होवून मृत्यु दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.
येणेप्रमाण ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज रोजी दि.११/११/२०२२ रोजी दिली

सही/-
कनिष्ठ लिपिक

शिक्का

सही/-
सहाय्यक अधीक्षक
फौजदारी न्यायालय पनवेल

**महाराष्ट्र शासन**
**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**
**Email :-mahad.ee@mahapwd.gov.in Ph.No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक ५२ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बा.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५. २२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या. https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा . नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा बयाना रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरुन) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बारसंगाव शिवथर रस्ता प्र.जि.मा. ७० कि.मी. १४/२०० ते १५/३००मध्ये नुतनीकरण करणे. (३.७५मी धावपट्टीचे ५.५० मी ने रुंदीकरण व डांबरीकरण) करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०४ जिल्हा व इतर मार्ग)** | ८१५४९७५ | ८२००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग चार अ व वरील |
| २ | करंजाडी विन्हेरे ते गव्हाडी कुंभार्डे आदिवासीवाडी जोडरस्ता ग्रा.मा. ४ कि.मी. ०/०० ते ३/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | ४१५६८९३ | ४२००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ३ | आंबिवली सोनालीकोंड जोडरस्ता ग्रा.मा. ९ कि.मी. ०/०० ते २/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | ३४२०१४९ | ३५००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ४ | शिरसावणे धनगरवाडी जोडरस्ता ग्रा.मा. २५३ कि.मी. ०/०० ते २/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरणे व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | ३०४५९०० | ३१००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच व वरील |
| ५ | शिरवली मानेचीधार जोडरस्ता ग्रा.मा. ११० कि.मी. ०/०० ते १/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | २६८१७९४ | २७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ६ | करंजाडी रा.मा. ९६ ते करंजाडी रेल्वे स्टेशन, सुतारकोंड नटेवाडी ते रा.मा. ९६ ला मिळणारा मार्ग कि.मी. ०/०० ते २/०० ग्रा.मा. ११ मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | २६६१८६० | २७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ७ | खुटील मुळगांव रस्ता ग्रा.मा. १६ कि.मी. ०/०० ते १/६०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | २६६१८५३ | २७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ८ | पांगारी मोरेवाडी जोडरस्ता ग्रा.मा. १६ कि.मी. ०/०० ते १/६०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | २६६०५६८ | २७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ९ | कुर्ले जोडरस्ता ग्रा.मा. ३७ कि.मी. ०/०० ते १/६०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | २६५४२४४ | २७००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १० | रेवतळे फौजदारवाडी रस्ता ग्रा.मा. १७१ कि.मी. ०/०० ते १/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | १९१०२७२ | २०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| ११ | मुमूर्शी रा.मा. ९६ ते भोमजाई मुमूर्शी रस्ता ग्रा.मा. १० कि.मी. ०/०० ते १/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | १९०५७६७ | २०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १२ | आदिस्ते सुतारकोंड ते खरांदेवाडी जोडमार्ग ग्रा.मा. १२४ कि.मी. ०/०० ते १/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | १५४३२१३ | १६००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १३ | सोनघर जोडरस्ता ग्रा.मा. १३८ कि.मी. ०/०० ते १/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | १५३०६७९ | १६००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १४ | मुमीर्शी बौध्दवाडी रस्ता ग्रा.मा. १७९ कि.मी. ०/०० ते १/५०० मध्ये रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | १५२७९४० | १६००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १५ | राजीवली जोडरस्ता ग्रा.मा. १२ कि.मी. ०/०० ते १/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | १५२४४७६ | १६००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १६ | रावतळी ग्रा.मा. ११२ ते मानेचीधार मार्ग (कि.मी. ०/०० ते १/५००) मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | १९०९९३५ | २०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १७ | चोचिंदे ते चोचिंदे गोळेवाडी रस्ता ग्रा.मा. २७६ कि.मी. ०/०० ते १/०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | १९२०२३९ | २०००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग पाच अ व वरील |
| १८ | मौजे कोंडमालुसरे ग्रा.पं. रेवतळे ता. महाड येथे सभामंडप बांधणे तालुका महाड, जिल्हा रायगड. **(आ.स्था.वि.)** | १३३५९४८ | १४००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| १९ | मौजे उंदेरी ता. महाड येथे सामाजिक सभागृह बांधणे तालुका महाड, जिल्हा रायगड. **(आ.स्था.वि.)** | ११५८५८० | १२००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |
| २० | फाळकेवाडी जोडरस्ता ग्रा.मा. १४७ कि.मी. ०/०० ते ०/५०० मध्ये रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. **(५०५४ मार्ग व पूल, ०३ रा.मा)** | ११४४१३० | १२००० | ५९०/- | ३ महिने | वर्ग सहा व वरील |

**ई निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक १४/११/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २८/११/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, महाड (सा. बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड यांचे कार्यालयात दिनांक ३०/११/२०२२ वेळ ११.०० वाजता. |

**टिप :-**

परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर शर्ती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पाहता येतील.

**जा.क्र. मवि/लेशा/निविदा/४६२८**
**दिनांक : ०३/११/२०२२**

**सही/**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा. बां.) विभाग, महाड**

# पनवेल मनपा करणार रेस्क्यू ऑपरेशन

## अग्निशमन दलात अत्याधुनिक वाहन झाले दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेचे अग्निशमन दलाची क्षमता दिवसेंदिवस वाढत आहे. फायर ब्रिगेड सक्षम होत असून आता अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी रेस्क्यू ऑपरेशनसुद्धा मनपाला करता येणार आहे. विशेष म्हणजे शीघ्र कृती वाहन ताफ्यामध्ये सामील झालेली आहे. अपघातग्रस्तांचे प्राण वाचवण्यासाठी हे 'देवदूत' वाहन वरदान ठरणार आहे.

सहा वर्षांपूर्वी पनवेल महानगरपालिकेची स्थापना झाली. त्याच कालावधीमध्ये नगर परिषदेची फायर यंत्रणा मनपाकडे वर्ग करण्यात आली. तेव्हा मनपाकडे मनुष्यबळाबरोबरच यंत्रसामुग्री त्याचबरोबर बंब यांची कमतरता होती. त्यानंतर अग्निशमन दल सक्षम करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेने पावले उचलली. कंत्राटी पद्धतीने फायरमन भरती करण्यात आली. त्याचबरोबर सव्वाचार कोटी रुपये खर्च करून तीन वाहने



खरेदी करण्यात आले. त्यामुळे साहजिकच अग्निशमन दलाची क्षमता बऱ्याच अंशी वाढली.

पनवेल परिसरामधून महामार्ग जातात. त्याचबरोबर अंतर्गत रस्त्यांची संख्यासुद्धा मोठी आहे. या ठिकाणी वाहनांचे अपघात घडतात. त्याचबरोबर काही वाहनांना आगसुद्धा लागण्याची घटना घडते.

या वेळी आपत्कालीन परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे राज्य सरकारने मिनी रेस्क्यू वाहन पनवेल महानगरपालिकेला दिली आहे. विशेष म्हणजे अग्निशमन दलाच्या ताब्यात हे वाहन दाखल झाले आहे. या वाहनाचा 'देवदूत' असा नामोल्लेख केला जातो.

### असे आहे मिनी रेस्क्यू व्हेईकल

**रेस्क्यू गाडीत तब्बल ८६ युकोपमेंट उपलब्ध असतील. त्यामध्ये ५०० लिटर पाण्याच्या टाकी आहे, स्टेपर, कटर, रॉड, पुल्ली त्यासोबत लिफ्टिंग बॅग, बॅटरी ऑपरेट टूल्स,ब्रिथिंग, ऑपरेटिव्ह सेट डी वॉटरिंग पम्प, मल्टी परपझ टूल्स, फर्स्ट मेडिकल किट, ऑपरेशन मेन्टनस टूल्स, रिमोट असे महत्त्वपूर्ण साहित्य या वाहनात उपलब्ध असतील. अपघातग्रस्तांना पत्रा कापून त्वरित बाहेर काढता येणे शक्य होईल. त्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकेल.**

# खारघर खाडीपात्रात अवैध वाळूउपशावर कारवाई

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर वसाहतीलगत असलेल्या खाडीपात्रात अवैधपणे वाळूउपसा करणाऱ्यांवर पोलीस व महसूल विभागाने कारवाई केली आहे. या कारवाईत वाळू उपसा करणारे दोन बार्ज व सक्शन पंप जप्त करण्यात आला आहे. पोलिसांची चाहूल लागताच बार्जवरील दोन कर्मचारी खाडीत उड्या मारून निसटल्यामुळे त्यांना पकडण्यात पोलिसांनी अपयश आले.

**दोन बार्ज व संक्शन पंप जप्त**

खारघर येथे गुरुवारी (दि. १०) केलेल्या कारवाईत मंडळ अधिकारी अजित पवार यांच्यासह तलाठी सुभाष पवार आणि कोतवाल अजय नावडेकर यांच्या पथकाला दुपारी बारा वाजता दोन बार्ज व एक सक्शन पंपाने वाळू उपसा हार्बर रेल्वेरुळापासून काही अंतरावर वाळूउपसा सुरू असल्याचे दिसले. याबाबत महसूल पथकाने तातडीने नवी मुंबई पोलिसांची सागरी सुरक्षा शाखेतील पोलीस अधिकारी श्रीकांत धरणे यांना संपर्क साधण्यात आला. पोलिसांचे पथक तिथपर्यंत पोहचेपर्यंत बाझवरील दोन कर्मचारी खाडीत उड्या मारुन पोहून तेथून निसटले. पोलीस व महसूल पथकाने बाझपर्यंत गेल्यावर तेथील दोन्ही बाझमध्ये नऊ ब्रास वाळू असल्याचे दिसले. या बाझ सध्या सागरी सुरक्षा पोलिसांच्या ताब्यात आहेत.

नवी मुंबई पोलीस दलात सागरी सुरक्षेचे कवच सुरक्षित आहे का याची चाचपणी करण्यासाठी पोलीस तैनात करण्यात आले होते.

# आवरे विद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील रामचंद्र म्हात्रे विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट सायन्स अँड कॉमर्स कनिष्ठ महाविद्यालयात गुरुवारी (दि. १०) माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियानांतर्गत माता भगिनींसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या आरोग्य शिबिराचे उद्घाटन इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाबासो कालेल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या वेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र इटकरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वाती म्हात्रे, डॉ. स्नेहल कोळी, डॉ.आश्विनी खडकीकर, डॉ. सुरेश पाटील, डॉ. रामदास देसले, आरोग्य अधिपारिचारिका संजीवनी म्हात्रे, संगीता शिंदे, हिरा वीर, प्राची पाटील, विलासिनी कोळेकर, औषध निर्माण अधिकारी बालाजी शेमाडे, जितेंद्र कोळी, संतोष पगारे, महादेव पवार यांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली.

शिबिरात आवरे, पाले, कडापे, गोवठणे, पिरकोन, वशेणी, चिरनेर परिसरातील मोठ्या संख्येने माता-भगिनींनी आरोग्य तपासणी करून घेतली, तसेच शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील इ. ५वी ते १२वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांची संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. नेत्र चिकित्सक तज्ज्ञ डॉ. सुदेश पाटील यांनी डोळ्यांच्या विकारांचे निदान केले.

# नायजेरियात अडकलेल्या युवकांसाठी लढा

## केंद्रीय यंत्रणेला ऑल इंडिया सिफेरस युनियनचे पत्र

**नवी मुंबई : बातमीदार**

भरतातातील तरुण हे नायजेरियात अडकले असून त्यांच्या या सुटकेसाठी नवी मुंबईतील ऑल इंडिया सिफेरस युनियन धावून आली आहे. या जहाजाच्या १६ भारतीय सिफेरर्सना मलाबोमध्ये ताब्यात घेण्यात आले आहे. हे जहाज ऑगस्टपासून इक्वेटोरियल गिनीमध्ये आहे आणि बेकायदेशीरपणे कच्चे तेल उचलल्याचा ठपका ठेवून नायजेरिया येथे नजरकैदेत आहे. यात अडकलेल्या भारतीयांनी ऑल इंडिया



सिफेरस युनियनकडे मदत मागितली असून युनियनच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी व शिपिंग केंद्रीय मंत्री सरबानंद सोनिवाल यांना पत्र लिहून मदत करण्याचे आवाहन केले आहे.

ऑल इंडिया सिफेअरर्स युनियनचे कार्याध्यक्ष अभिजित सांगळे व अध्यक्ष संजय पवार यांनी, गेले तीन महिने या जहाजातील कर्मचाऱ्यांसोबत गैव्यवहार करण्यात येत आहे. त्यांना अन्न पाणीसुद्धा दिले जात नसून एकाच खोलीत जमिनीवर बसवून ठेवले आहे. यातले काही सिफेरर्स आजारी पडले आहेत. त्यांच्यावर औषधोपचारसुद्धा केले जात नाहीत. महत्त्वाचा मुद्दा शिप मालकाने दंड भरल्यानंतरसुद्धा कायदेशीर कारवाही थांबवण्यात आलेली नसल्याचे युनियनच्या वतीने पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. भारत सरकारने त्वरित याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे.



**कळंबोली : शांततेचा संदेश देणारे शीख धर्माचे संस्थापक गुरू नानक यांची ५३३वी जयंती नुकतीच उत्साहात साजरी झाली. यानिमित्त कळंबोली गुरुद्वाराच्या वतीने विशाल नगर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी युवा नेते हॅप्पी सिंग, निशांत सिंग गिल व अमरजित सिंग आनंद यांनी परिश्रम घेतले.**

## 'महामार्गांवर स्वतंत्र प्रवासी मार्गिका करावी'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्य व राष्ट्रीय महामार्गावर अपघात व वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढल्याने स्थानिक प्रवाशांचा खोळंबा होतो. त्यामुळे महामार्गावर स्वतंत्र प्रवासी मार्गिका निर्माण करण्याची मागणी वळवलीतील भाजपचे कार्यकर्ते मेघनाथ म्हात्रे यांनी केली आहे.

पनवेलमधून जाणाऱ्या महामार्गांवरून सातत्याने अवजड वाहनांची वाहतूक सुरू असते. त्यामुळे अनेक वेळा प्रवाशांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. त्यामुळे महामार्गांवर स्वतंत्र प्रवासी मार्गिका तयार करावी, अशी मागणी भाजपचे मेघनाथ म्हात्रे यांनी केली आहे.



**पनवेल : भाजप अनुसूचित जाती मोर्चाच्या करंजाडे शहर अध्यक्षपदी विक्रम रामचंद्र मोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना अनुसूचित मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष प्रकाश बिनेदार, भाजपचे जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, करंजाडे शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे, युवा नेते मंगेश शेलार, तालुका उपाध्यक्ष बळीराम म्हात्रे, अतिश साबळे यांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देण्यात आले.**



**उलवे नोड : भाजपच्या उलवे नोड महिला मोर्चाध्यक्ष निकिता निलेश खारकर यांच्या पाठपुराव्यामुळे उलवे राजिप शाळेला ग्रामपंचायतीतर्फे शुक्रवारी ५० बेंच देण्यात आले.**

# पनवेल महापालिकेचा स्वच्छतेसाठी पुढाकार

## छत्रपती शिवाजी नगर परिसरात स्वच्छतेसह सुशोभीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ सर्वेक्षण २०२२-२०२३ तयारीसाठी पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक १७, छत्रपती शिवाजी नगर वसाहत, ५० नंबर बसथांबा येथील जीव्हीपी कचरा स्पॉट येथे गुरुवारी (दि. १०) स्वच्छता मोहीम राबवून सुशोभीकरण करण्यात आले.

या ठिकाणी पाहणी करताना आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड, स्वच्छता निरीक्षक अनिकेत जाधव, पर्यवेक्षक रमेश गरुडे, नंदू जाधव, अंकुश पाटील, उत्तम चिखलेकर, संदीप जाधव, भाजप उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, भाजप अनुसूचित जाती मोर्चा पनवेल तालुका उपाध्यक्ष रावसाहेब खरात, शहर अनुसूचित जाती मोर्चा सदस्य भाजप युवा कार्यकर्ते निलेश पाटील, विजय झिरे, गोरख खवले, राम येडे, आनंद वाहुळकर, बेदू टाक, बन्सराज कश्यप आणि नागरिक उपस्थित होते.



छत्रपती शिवाजी नगर वसाहत नागरिकांनी व दुकानधारकांनी, आम्ही रस्त्यावर कचरा टाकणार नाही व दुसऱ्यालाही रस्त्यावर कचरा टाकू देणार नाही, असे या वेळी सांगितले.

# एपीएमसीत प्रसिद्ध नागपूर संत्री दाखल

## बाजारात फळाची आवक वाढली

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई कृषी उत्पन्न फळ बजार समितीत नोव्हेंबर महिन्यापासून गावठी मोसंबी व संत्री फळांचा हंगाम सुरू होतो. बाजारात सध्या २५५९ क्विंटल संत्री तर १६०० क्विंटल मोसंबी दाखल झाली आहेत. आता नागपूरची गोड मोसंबी दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. ग्राहक मद्रासच्या आंबट मोसंबीपेक्षा गोड मोसंबीला जास्त पसंती देतात.

ऑक्टोबर महिन्यात फळधारणा झालेल्या संत्राच्या पिकाला पावसामुळे २० टक्के ते २५ टक्के फटका बसला. एपीएमसीत मागील वर्षी यादरम्यान २५-३० गाड्या दाखल झाल्या होत्या ते आता २०-२५ गाड्या दाखल होत



आहेत. एपीएमसीमध्ये सर्व हंगामात मद्रासची मोसंबी जास्त प्रमाणात उपलब्ध असते. नोव्हेंबर- डिसेंबर महिन्यात थोड्या प्रमाणात नागपूर, अमरावती, जालनाची गोड मोसंबी दाखल होण्यास सुरुवात होते. बाजारात नागपूरची मोसंबी दाखल होताच त्या मालाचा उठाव लगेच होतो. अमरावती आणि विदर्भातून येणारे संत्र आकाराने मोठे व अधिक गोड असते.

घाऊक बाजारात संत्रीच्या आठ डझनला पेटी ९०० रु. ते १२०० रु. दर आहे.

### मोसंबीलाही ग्राहकांची मिळतेय पसंती

***मद्रासची मोसंबी ही आकाराने मोठी व चवीला आंबट असते. अशी मोसंबी जास्तीस्त जास्त रसाकरीता वापरली जाते, मात्र नागपूरची गोड मोसंबी नागरिक आवडीने खातात, परंतु ग्राहकांच्या मागणी नुसार बाजारात गोड मोसंबीची आवक कमी प्रमाणातच होत असते.***

# शिष्यवृत्ती परीक्षेत कळंबुसरे शाळेतील विद्यार्थ्यांचे यश

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील रायगड जिल्हा प्राथमिक शाळा कळंबुसरे येथील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी नुकत्याच जाहीर झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता यादीत सन २०२२मध्ये झालेल्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

कळंबुसरे गावातील अविष्कार पाटील, सूर्य पाटील, श्रीमत् पाटील, सोनाक्षी पाटील, सृष्टी पाटील यांनी इयत्ता ५वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत प्राविण्य



मिळविले आहे.

या यशाने कळंबुसरे प्राथमिक शाळेची गुणवत्ता वाढली आहे. दरम्यान या यशाबद्दल प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांनचे, शाळा व्यवस्थापन समिती, पालकवर्ग आणि, शिक्षक वृंदाकडून अभिनंदन होत आहे.

# तुपगाव सरपंचपदी रवींद्र कुंभार विराजमान



## उपसरपंचपदी सुयोग भालेकर यांची निवड

**चौक : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील तुपगाव ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदी भारतीय जनता पक्षाचे रवींद्र कुंभार निवडून आले होते. त्यांनी शुक्रवारी (दि. ११) दुपारी पदभार स्वीकारला. या वेळी भाजपच्या सुयोग भालेकर यांची उपसरपंचपदी निवड करण्यात आली.

तुपगाव ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक १६ ऑक्टोबर रोजी झाली होती. त्यात थेट सरपंचपदी भाजपचे रवींद्र कुंभार विजयी झाले होते. त्यांनी शुक्रवारी दुपारी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन सरपंचपदाची सूत्रे हाती घेतली. या वेळी उपसरपंचपदी भाजपचे सुयोग भालेकर यांची निवड करण्यात आली.

तुपगाव ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सदस्य सचिन साखरे, शरीफ भालदार, महेश परीट, तंटामुक्ती कमिटीचे योगेश गुरव, विजय भालेकर, यशवंत सकपाळ, शेखर मोरे, अमोल सपकाळ, मधुकर गुरव, हरिभाऊ भालेकर, शेखर भालेकर, सचित भालेकर, चेतन चव्हाण, नंदू सोनावणे, ओंकार भालेकर, रूपेश जाधव, राजू बडेकर, दिनेश मोरे, कांता नागावकर, स्वाती जाधव, रोहिणी गुरव, सपना गुरव, अश्विनी मोरे यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते. या वेळी सरपंच रवींद्र कुंभार आणि उपसरपंच सुयोग भालेकर यांची सवाद्य मिरवणुक काढण्यात आली होती.

# पेण येथे नदीत आढळलेली वस्तू स्फोटके नाहीत!

## रायगड पोलिसांनी केले स्पष्ट

**अलिबाग, पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील पेण येथील भोगवती नदीच्या पुलाखाली पाण्यात आढळलेली वस्तू बॉम्ब किंवा इतर कोणतेही स्फोटके नसल्याचे रायगड पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

गुरूवारी (दि. १०) सायंकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास मुंबई-गोवा महामार्गावर पेण तालुक्यातील तरणखोप येथील पुलाखाली भोगवती नदीपात्रातील पाण्यात बॉम्बसदृष्य वस्तू दिसून येत आहे, अशी माहिती पोलिसांना देण्यात आली. या माहितीची पोलिसांनी दखल घेवून तात्काळ घटनास्थळ संरक्षित करून याबाबतची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकारी, बॉम्बशोधक पथक रायगड, पेण नगर परिषद अग्निशमन दल, जिल्हाधिकारी यांना देण्यात आली.

रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे हे तात्काळ घटनास्थळी उपस्थित झाले. त्यांनी रायगड व नवी मुंबई येथील बॉम्बशोधक पथकांना कार्यवाही करण्याचे आदेश दिले. रायगड व नवी मुंबईच्या बॉम्बशोधक पथकांनी संयुक्तपणे कार्यवाही करून बॉम्बसदृष्य वस्तू सुरक्षितरित्या पाण्याच्या बाहेर काढल्या. त्यांची क्ष-किरण तपासणी केली. त्यात या वस्तू बॉम्ब किंवा इतर स्फोटके नसून डमी असल्याचे निष्पन्न झाले.

रायगड जिल्ह्यातील एका जागरूक तरुणाने या घटनेची माहिती तत्काळ पोलिसांना कळवून पोलिसांना सहकार्य केल्याबद्दल रायगड पोलिसांतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

**रायगड पोलिसांमार्फत संपूर्ण जिल्ह्यामध्ये कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत जागरूक नागरिक ही मोहीम राबविण्यात येत असते. या मोहिमेला नागरिकांनी प्रतिसाद देवून, दक्ष राहून अशा प्रकारची स्फोटकसदृश्य वस्तू किंवा हालचाल आढळून आल्यास त्याबाबत पोलिसांना तत्काळ माहिती द्यावी.**

**-सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक, रायगड**

## कमळ पतसंस्थेच्या रक्तदान शिबिरास प्रतिसाद



**अलिबाग : प्रतिनिधी**

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश तुळपुळे यांच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (दि. ११) संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरास रक्तदात्यांनी चांगला प्रतिसाद दिला. अलिबाग येथील कमळ भवनात घेतलेल्या या शिबिरात १०३ जणांनी रक्तदान केले.

आमदार महेंद्र दळवी यांच्या उपस्थितीत रक्तादान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते गिरीश तुळपुळे यांचा सत्कार करण्यात आला. नीला तुळपुळे, कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीश पाटील, उपाध्यक्ष नंदकुमार चाळके, सेक्रेटरी गीतांजली ओक, राजेश प्रधान, श्रीनिवास पाटील, आप्पा कारंबत, संतोष पुरो, महेश देशमुख, कौस्तुभ कुलकर्णी, स्नेहा गांधी, जयंत वाखारकर आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. सहयोग नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर तसेच इतर पतसंस्थांच्या संचालकांनी गिरीश तुळपुळे यांना भेटून त्यांना शुभेच्छा दिल्या.

कमळ पतसंस्थेतर्फे दर वर्षी ११ नोव्हेंबर रोजी संस्थेच्या सर्व शाखांमध्ये ग्राहक मेळावा व ग्राहक भेटीचा कार्यक्रम आयोजित केला जातो. या वर्षी ११ नोव्हेंबर रोजी ग्राहकदिन तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त संस्थेतर्फे रक्तदान शिबिर आयोजित करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला होता.

## महिलेची छेड करणाऱ्या तरुणाविरोधात गुन्हा दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

शहरातील एका विवाहित महिलेचा पती परदेशात नोकरीसाठी गेल्याची माहिती घेवून खोपोली परिसरातील तरुणाने त्या विवाहितेची छेड काढण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

कर्जत शहरातील दहिवली परिसरात विवाहीत महिला आपल्या दोन मुलांसह राहत आहे. या महिलेचा पती नोकरीनिमित्त आखाती देशात गेल्याची खबर मिळताच खालापूर तालुक्यातील ढेकू गावातील तरुणाने या विवाहितेचा मोबाइल नंबर मिळविला. त्यानंतर रात्रीच्या वेळी महिलेला मोबाइलवरुन व्हाईसकॉल करुन तिच्याशी अश्लील शब्दात बोलून तसेच विनयभंग केला. त्यानंतर तो तरुण महिलेचा पाठलाग करून त्रास देवू लागला. घाबरलेल्या विवाहीत महिलेने कर्जत पोलीस ठाणे गाठून मयुर चिंतामण चव्हाण (रा. ढेकू, ता. खालापूर) यांच्याविरोधात तक्रार केली.

या प्रकरणी मयुर चव्हाण यांच्याविरोधात भारतीय दंड संहिता १८६० कलम ५०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक के. डी.कोल्हे अधिक तपास करीत आहेत.

## जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत ऑनलाइन मार्गदर्शन सत्र

**अलिबाग : जिमाका**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने रायगड जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता मार्गदर्शन केंद्रा मार्फत जिल्ह्यातील व्यवसाय इच्छुक तरुणांना मार्गदर्शन करण्यासाठी ऑनलाइन मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या चर्चासत्रामध्ये विविध विषयातील तज्ज्ञ मंडळींकडून व्यवसायविषयक मार्गदर्शन केले जाणार आहे.

बदलत्या काळानुरूप शेती या पारंपरिक व्यवसायाचे स्वरूपही बदलते आहे. या पारंपरिक उद्योगास नवीन शेतीपूरक जोडधंद्यांची साथ दिल्यास चांगली उत्पन्न निर्मिती करता येईल. यानुषंगाने जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत मंगळवारी (दि.१५) सकाळी ११ वाजता 'चला उद्योजक होऊया' या ऑनलाइन मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या विषयांतर्गत कृषी क्षेत्रातील नवउद्योजक हेमंत कोंडीलकर हे सेंद्रिय खत निर्मितीतून स्वयंरोजगार या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. हे सत्र सगळ्यांसाठी खुले असून गुगल-मीट या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर होणार आहे. या ऑनलाइन सत्रामध्ये सहभागी होण्याकरिता इच्छुकांनी https://meet.google.com/nad-zpkc-ugg या लिंकचा वापर करावा.

रायगड जिल्ह्यातील व्यवसायभिमुख तरुण, शेतकरी, बचतगटातील महिला, कृषी क्षेत्राशी निगडीत सर्वांनी या मार्गदर्शन सत्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त अमिता मु. पवार यांनी केले आहे.

## पेणमध्ये विधी सेवा समितीची रॅली



**पेण : प्रतिनिधी**

कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाद्वारे नागरिकांचे सक्षमीकरण आणि 'हक हमारा भी तो है ७५' अंतर्गत ३१ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबरपर्यंत सर्वत्र जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून तालुका विधी सेवा समिती मार्फत बुधवारी (दि. ९) पेण शहरात बाईक रॅली काढण्यात आली होती.

पेण तालुका विधी समिती अध्यक्षा न्या. आर.एन. मुजावर, सहदिवाणी न्यायाधीश प्रितेश देशपांडे, वकील संघटनेचे अध्यक्ष भगवान म्हात्रे तसेच ॲड. संजय पाटील, ॲड. आर. आर. पाटील, ॲड. सतिश पाटील, ॲड. सुयोग कडू, ॲड. भक्ती पाटील, ॲड. अहद अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक समद बेग यांच्यासह इतर वकील, न्यायालयातील कर्मचारी, व पोलीस कर्मचारी यांनी रॅलीमध्ये सहभाग घेतला होता.


## नाताळपूर्वी माथेरानचे रस्ते होणार चकाचक!

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

गेल्या अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या माथेरान बाजारपेठेतील महात्मा गांधी रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याने ख्रिसमसपूर्वी हा रस्ता धूळविरहित होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

एमएमआरडीएच्या माध्यमातून माथेरानमधील अनेक रस्ते क्ले पेव्हर ब्लॉकने तयार करण्यात येत आहेत. शहरातील महात्मा गांधी रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम दोन वर्षांपूर्वी सुरू झाले होते. परंतु हे काम दिवाडकर हॉटेलपर्यंत आल्यानंतर बंद झाले होते. आता पावसाळा थांबल्यानंतर या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. यापूर्वीचे सिमेंटचे ब्लॉक काढून तेथे नवीन क्ले पेव्हर ब्लॉक बसविण्यात येत आहेत. त्यामुळे हा मुख्य रस्ता धूळ विरहित होणार असून पर्यटक व नागरिकांना या रस्त्यावरून चालताना धुळीपासून दिलासा मिळणार आहे.

माथेरान नगर परिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे-शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बाजारपेठेतील रस्ते क्ले पेव्हर ब्लॉकने होत असल्याने ई रिक्षाचा मार्ग सुकर होणारच आहे, शिवाय मालवाहू हातगाड्या व सध्या अस्तित्वात असलेल्या हातरिक्षा यांनाही दिलासा मिळणार आहे.



## कर्जतमध्ये भात उत्पादनात वाढ

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात यंदा नऊ हजार ११० हेक्टरवर भात लागवड करण्यात आली आहे. मागील वर्षी आठ हजार ९९० हेक्टरवर भात शेती करण्यात आली होती. या वर्षी कमी दिवसात अधिक उत्पन्न देणारे सुधारित भात जाती बियाण्याची शेतकऱ्यांनी लागवड केल्याने कर्जत तालुक्यातील भात उत्पादनात वाढ झाल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे यांनी दिली.

कर्जत तालुक्यात यंदा हजार ११० हेक्टरवर भाताची तर १०० हेक्टरवर नाचणी, १७ हेक्टरवर तूर, १६ हेक्टरवर भुईमूग आणि ४१ हेक्टरवर भाजीपाल्याची लागवड करण्यात आली आहे. तालुक्यातील शेतकरी काही वर्षांपूर्वी रत्ना, जया या भातजातींचे पीक घ्यायचे. हे पीक तयार होण्यास १४० ते १५० दिवसांचा कालावधी लागतो, मात्र आता त्याला पर्याय म्हणून कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राने कमी दिवसात अधिक उत्पन्न देणारे सुधारित भात जाती बियाणे म्हणून कर्जत-७ आणि कर्जत-५ विकसित केली आहेत. त्याचप्रमाणे कर्जत-३लाही शेतकऱ्यांची अधिक पसंती आहे. या जातींची भातपिके अवघ्या ११५ ते १२५ दिवसांत तयार होत असून प्रति हेक्टर ४० ते ४५ क्विंटल भात उत्पन्न निघत असल्याचे कृषी अधिकाऱ्यांनी सांगितले.

प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राने १९९८ मध्ये विकसीत केलेले सह्याद्री हे संकरित वाण महाराष्ट्रातील पहिले तर भारतातील तिसरे संकरित वाण आहे. त्यानंतर याच संशोधन केंद्राने सह्याद्री २,३,४ या संकरित जाती विकसित केल्या आहेत. त्यानंतर सह्याद्री ५ हे संकरित वाण शिरगाव (जि. रत्नागिरी) भात संशोधन केंद्राने विकसित आणि शिफारीत केले आहे.

## शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शैक्षणिक धडे

**पेण : प्रतिनिधी**

कोरोना काळात रायगड जिल्ह्यात आदिवासी मुलांच्या शिक्षणात खंड पडला. या काळात शाळाबाह्य झालेल्या अनेक आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नवे मार्ग शोधण्याची गरज असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी पेण येथे केले.

पेण येथील अंकुर ट्रस्ट व आदिवासी विकास प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या आदिम जमाती संरक्षण कार्यक्रमाच्या सांगता शिबिरात डॉ. वैशाली पाटील मार्गदर्शन करीत होत्या.



राज्य शासनाने अति दुर्गम व डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी लोकांचा शैक्षणिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी १९७२-७३ पासून आश्रमशाळांची योजना कार्यान्वित केली. परंतु कोरोना संकटामुळे नियमित शाळा, वसतीगृह बंद झाले व याचा मोठा परिणाम शिक्षणाच्या सातत्त्यावर राहिला. ऑनलाइन शिकवणीची कोणतीही सोई सुविधा नसल्याने असे विद्यार्थी शैक्षणिक प्रवाहातून दूर फेकले गेले, त्यांना पुन्हा प्रवाहात आणण्यासाठी आदिवासी विकास प्रकल्पाने आदिम जमाती संरक्षण कार्यक्रम सुरु केला.

या कार्यक्रमांतर्गत १५ शिक्षण केंद्रे सुरु करण्यात आले . यामध्ये एकूण १५७ विद्यार्थ्यांच्या समावेश होता. मुलांना अभ्यासात मार्गदर्शन करण्यासाठी केंद्रावर ८ शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. यामध्ये कल्पना पवार, गणेश वाघमारे, विवेक पवार या शिकलेल्या कातकरी प्रशिक्षकांचा समावेश घेतला. याबरोबरच श्वेता देसाई, गौरी दळवी, गार्गी पाटील, मिनल सांडे, प्रतिक्षा पोपकर या तरुणींचा समावेश होता.

विविध वाड्यांवर शाळाबाह्य आदिवासी आदिवासी मुलांसाठी कार्यशाळा घेण्यात आल्या. खेळ, दृकश्राव्य यांच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्व पटवून शिक्षण घेणे का गरजेचे आहे, हे सांगण्यात आले. याबाबत श्वेता देसाई म्हणाल्या 'कातकरी आदिवासी मुलांना पाठ्यपुस्तकापेक्षा परिसरातून शिकण्यात जास्त रस असल्याचे दिसून येते'. त्याचप्रमाणे गौरी दळवी यांनी अभ्यासकेंद्रात पाठ्यपुस्तकाबरोबरच खेळ, नृत्य, गाणी, दृकश्राव्य व नेतृत्व गुण या माध्यमातून मुलांना शिकण्यास जास्त आवड असल्याचे सांगितले. या योजनेंतर्गत आलेल्या या कार्यक्रमाद्वारे अभ्यास केंद्रातील विद्यार्थ्यांना औपचारिकरीत्या निरोप देण्यात आला. या वेळी शाळा बाह्य विद्यार्थी अभ्यास केंद्रातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## मुरूड तालुका सेवानिवृत्त संघटनेची बैठक उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

राज्य शासनाने ज्येष्ठांना निर्वाह भत्ता द्यावा, व त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करावी, अशी मागणी रायगड जिल्हा ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष सुरेश पालकर यांनी मरूड येथे केली.



मुरूड तालुका सेवानिवृत्त संघटनेची बैठक नुकताच झाली. या बैठकीत संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुरेश पालकर उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. शासन योजनांचा लाभसाठी ज्येष्ठांनी संघटीत होणे गरजेचे आहे, असे कर्णिक यांनी या वेळी सांगितले.


६० वर्षे वय ग्राह्य धरून ज्येष्ठतेचा लाभ मिळावा, एसटीने स्मार्ट कार्ड सक्तीचे न करता पूर्वीप्रमाणे आधार कार्ड, निवडणूक कार्ड यांच्या आधारे प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत द्यावी, अशा मागण्या या बैठकीत करण्यात आल्या.

मुरूड तालुका सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष नयन कार्णिक, उपाध्यक्ष केशव साने, सचिव मनोहर दिघे, समन्वयक एम. एस. जाधव, बी. व्ही. कासार, गजानन पाठक, जिल्हा कार्यकारिणी सदस्य अनंत जोशी, प्रकाश पाटील, उषा वैद्य, यशवंत पाटील, रमेश कवळे, विलास जगताप आदी या बैठकीला उपस्थित होते. मनोहर दिघे यांनी आभार प्रर्दशन केले.

# सचिन, युवीकडून टीम इंडियाची पाठराखण

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघ टी-२० विश्वचषकातून बाहेर पडला आहे. उपांत्य फेरीत इंग्लंडने भारताला १० विकेट्सने धूळ चारली. या पराभवानंतर अनेक माजी क्रिकेटपटू टीम इंडियावर जोरदार टीका करीत आहेत, तर खराब कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना संघातून वगळण्याची मागणी चाहते करीत आहेत. अशा परिस्थितीत भारताच्या दोन माजी खेळाडूंनी चाहत्यांना वाईट काळात संघाला साथ देण्याचे आवाहन केले आहे. २०११चा विश्वचषक विजेत्या संघाचा भाग असलेला सचिन तेंडुलकर आणि त्याच टूर्नामेंटचा सर्वोत्तम खेळाडू ठरलेला युवराज सिंग हे टीम इंडियाच्या समर्थनार्थ मैदानात उतरले आहेत.



इंग्लंडविरुद्धच्या दणदणीत पराभवानंतर सचिनने ट्वीट करून म्हटले की, एका नाण्याला दोन बाजू असतात. जीवनाचेही तसेच आहे. संघाचा विजय हा आपला विजय म्हणून साजरा केला, तर संघाच्या पराभवातही असेच केले पाहिजे. आपण त्यांचा स्वीकार केला पाहिजे. या दोन गोष्टी आयुष्यात बरोबरीने चालत असतात.

याचबरोबर युवराज सिंग ट्वीटमध्ये म्हणाला, जेव्हाही आपला संघ मैदानात उतरतो तेव्हा आपल्याला आपला संघ जिंकताना पहायचा असतो, मात्र हे मान्य करावे लागेल की, असे काही दिवस येतील की, जेव्हा आपल्यानुसार निकाल मिळणार नाहीत. संपूर्ण स्पर्धेत संघ ज्या प्रकारे एकजुटीने खेळला त्याचा मला अभिमान आहे. आता आम्ही आमची कामगिरी आणखी कशी सुधारू शकतो आणि जोरदार पुनरागमन करू शकतो हे पाहण्याची वेळ आली आहे.

उपांत्य फेरीच्या सामन्याबद्दल बोलायचे झाले, तर इंग्लंडने भारतावर १० विकेट्स राखून मात केली. त्यांनी १६९ धावांचे लक्ष्य एकही विकेट न गमावता पूर्ण केले. प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ७ बाद १६८ धावा केल्या होत्या. ज्यामध्ये हार्दिकने ३३ चेंडूत ६३ धावांची शानदार खेळी खेळली. त्याचवेळी विराट कोहलीने ५० धावा केल्या. प्रत्युत्तरात इंग्लंड संघाने १६ षटकांत बिनबाद १७० धावा केल्या. इंग्लंडकडून ॲलेक्स हेल्सने ४७ चेंडूंत नाबाद ८६, तर कर्णधार जोस बटलरने ४९ चेंडूंत नाबाद ८० धावा केल्या.

## न्यूझीलंड दौऱ्यात द्रविडला विश्रांती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकातील भारताची मोहीम संपली आहे. सेमीफायनलमध्ये इंग्लंडने टीम इंडियाचा १० गडी राखून पराभव केला. विश्वचषकानंतर आता भारतीय संघाला न्यूझीलंडचा दौरा करायचा आहे. टीम इंडियाच्या वरिष्ठ खेळाडूंना न्यूझीलंड दौऱ्यासाठी विश्रांती देण्यात आली आहे. पीटीआय या वृत्तसंस्थेनुसार मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनाही या मालिकेसाठी विश्रांती देण्यात आली आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात १८ नोव्हेंबरपासून मालिका सुरू होत आहे. या मालिकेत तीन टी-२० आणि तीन एकदिवसीय सामने खेळले जाणार आहेत. मालिकेत द्रविडच्या जागी राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे संचालक आणि माजी अनुभवी फलंदाज व्हीव्हीएस लक्ष्मण टीम इंडियाच्या कार्यवाहक मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी स्वीकारतील.

## विराटने मानले चाहत्यांचे आभार

**सिडनी : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या पराभवानंतर टीम इंडिया टी-२० विश्वचषक स्पर्धेतून बाहेर पडली आहे. यंदाचा टी-२० विश्वचषक भारतीय संघासाठी सर्वांत यशस्वी ठरला होता पण ऐन मोक्याच्या वेळी संघाची घडी विस्कटली भारताला लाजिरवाणा पराभव पत्करावा लागला. इंग्लंडकडून दारुण पराभवनांतर भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीने एक भावनिक पोस्ट केली आहे. त्याचप्रमाणे त्याने चाहत्यांचे आभार मानले आहेत.

विराट कोहलीसाठी यंदाचा टी २० विश्वचषक हा वैयक्तिक स्तरावर अत्यंत यशस्वी ठरला. चार अर्धशतकांसह ९८.६६च्या जबरदस्त सरासरीने २९६ धावांसह तो या स्पर्धेत सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. २०१५ व २०१९च्या ५० षटकांच्या विश्वचषकातील निराशेनंतर भारतीय संघाप्रमाणे विराटचाही हा चौथा विश्वचषक उपांत्य फेरीतील पराभव आहे.



विराटने ट्वीट करीत लिहिले की, मनात निराशा व स्वप्नभंगाचे दुःख घेऊन आम्ही ऑस्ट्रेलियाचा किनारा सोडत आहोत, पण माघारी येताना आम्ही अनेक आठवणी घेऊन निघालो आहोत. एक टीम म्हणून सकारात्मक ऊर्जा घेऊन आम्ही इथून पुढे नव्याने लढण्याची जिद्द घेऊन येत आहोत. आतापर्यंत दिलेल्या पाठिंब्यासाठी सर्व चाहत्यांचे आभार. ही जर्सी घालून देशाचे प्रतिनिधित्व करताना खरोखरच नेहमी अभिमान वाटतो.

## मुलींच्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत बोरी, आवरे, उरण संघ विजेते



**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय आणि उरण पंचायत समिती यांच्या विद्यमाने चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या विद्यालयात नुकतेच विद्यार्थिनींच्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बोरी आणि आवरे येथील संघांनी वेगवेगळ्या गटात बाजी मारली.

या स्पर्धेचे उद्घाटन पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन समीर खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनावेळी प्रशासकीय अधिकारी आर. एन. पाटील, मुख्याध्यापक सुरदास राऊत, विविध शाळांचे क्रीडा शिक्षक तसेच संघ व्यवस्थापक उपस्थित होते.

या स्पर्धेत तालुक्यातील अनेक शाळांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात १४ वर्षे वयोगटात बोरी येथील रोटरी इंग्लिश मीडियम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजच्या मुलींनी प्रथम क्रमांक पटकाविला. मोरा येथील जे. एम. म्हात्रे ट्रस्ट न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थिनींनी द्वितीय, १७ वर्षे वयोगटात आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालय व ज्युनिअर कॉलेजने प्रथम, सेंट मेरी जेएनपीटीच्या विद्यार्थिनींनी द्वितीय, १९ वर्ष वयोगटात उरण एज्युकेशन सोसायटीने प्रथम आणि चिरनेर येथील पी. पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीने द्वितीय क्रमांक पटकाविला. स्पर्धेतील विजेत्या संघांतील विद्यार्थिनींचे अभिनंदन करण्यात आले.

## संपूर्ण विश्वचषकात युजवेंद्र चहलला संधी न दिल्याने हरभजन सिंग संतापला

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडिया आपला दुसरा टी-२० विश्वचषक जिंकण्याच्या उद्देशाने ऑस्ट्रेलियात दाखल झाली होती, मात्र या वेळीही पदरी निराशा आल्याने सध्या चोहीकडून संघावर टीकेचा भडीमार सुरू आहे. त्याचवेळी विश्वचषकासाठीच्या संघात समाविष्ट असलेला फिरकीपटू युजवेंद्र चहल याला संपूर्ण स्पर्धेत एकही सामना खेळायला मिळाला नाही. त्यामुळे अनेकांनी संघ व्यवस्थापनाला धारेवर धरले आहे. भारताचे माजी क्रिकेटपटू हरभजन सिंगही यावरून संतापला आहे.



टीम इंडियाने विश्वचषकात सहा सामने खेळले. या सहाही सामन्यात युजवेंद्र चहलला एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. विश्वचषकासाठी निवड झालेल्या भारतीय संघातील तो एकमेव असा खेळाडू राहिला ज्याला एकाही सामन्यात खेळण्यासाठी निवडले गेले नाही. ऑस्ट्रेलियातील मोठ्या मैदानांचा लाभ त्याला होईल अशी अपेक्षा ठेवून त्याची निवड केली गेलेली, मात्र स्पर्धेदरम्यान भारतीय संघ व्यवस्थापनाने व कर्णधार रोहित शर्माने रविचंद्रन अश्विन व अक्षर पटेल यांच्यावर विश्वास दाखवला.

येत्या २०२२ या संपूर्ण वर्षभरात युजवेंद्र चहल हा भारताचा सर्वोत्तम फिरकीपटू होता. त्याने या वर्षी भारतीय संघासाठी खेळताना १४ बळी मिळवलेले तसेच यंदाच्या आयपीएलमध्येही सर्वाधिक बळी मिळवत पर्पल कॅप आपल्या नावे केलेली. विश्वचषकापूर्वी झालेल्या सराव सामन्यातदेखील तोच भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाज होता.

विश्वचषक स्पर्धेसाठी समालोचन करणारे भारताचे माजी क्रिकेटपटू हरभजन सिंग, इरफान पठाण, आकाश चोप्रा व रवी शास्त्री हे सातत्याने चहलला संघात स्थान देण्याविषयी बोलताना दिसले. हरभजन याने म्हटले की, सध्या फलंदाजी विभागात ज्या प्रकारे विराटचा दर्जा आहे त्या प्रकारे फिरकी गोलंदाजीत चहलचा दर्जा दिसतो, तर चोप्रा व शास्त्री यांनी भारताने ऑस्ट्रेलियातील मोठ्या मैदानाचा फायदा घेण्यासाठी चहलला संधी द्यावी, असे म्हटले. उपांत्य फेरीत भारतीय संघाचा पराभव झाल्यानंतर इरफानने 'युजवेंद्र चहल' असे ट्वीट करीत आपली निराशा व्यक्त केले, तर काही चाहत्यांनी चहलला केवळ ऑस्ट्रेलिया फिरायला घेऊन गेले होते का, असा सवाल केला आहे.

## पाकिस्तान-इंग्लंड अंतिम सामन्यावर पावसाचे सावट

**मेलबर्न : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषकातील इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातील अंतिम सामना मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर खेळला जाणार आहे. या सामन्यात पावसाचा धोका असून ऑस्ट्रेलियाच्या हवामानशास्त्र विभागाने रविवारी म्हणजेच १३ नोव्हेंबर रोजी मेलबर्नमध्ये पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.



ऑस्ट्रेलियात सुरू असलेला टी-२० विश्वचषक पावसामुळे जास्त चर्चेत राहिला आहे. सुपर-१२मधील चार सामने हे पावसामुळे रद्द करण्यात आले होते, तर इतर दोन सामन्यात डकवर्थ लुईसच्या नियमानुसार निकाल जाहीर करावा लागला होता.

मेलबर्नच्या हवामान खात्याच्या माहितीनुसार, १३ तारखेला ढगाळ वातावरण असणार असून १०० टक्के पावसाचा अंदाज आहे. गडगडाटी वादळाची शक्यतादेखील आहे. दरम्यान, अंतिम सामन्यासाठी एक दिवस राखीव ठेवण्यात आला असल्याने चिंतेचे काही कारण नाही, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) स्पष्ट केले आहे.

## भारतीय संघाच्या पराभवाचे सर्वांत मोठे कारण मानसिकता -कपिल देव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारतीय संघाचा पराभव झाल्यानंतर दिग्गजांच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. १९८३मध्ये भारताला पहिल्यांदा वर्ल्ड चॅम्पियन बनवणारे कर्णधार कपिल देव यांच्या म्हणण्यानुसार संघाच्या पराभवाचे सर्वांत मोठे कारण त्यांची मानसिकता आहे, कारण टी-२० हा ज्या प्रकारे खेळ आहे, भारतीय संघ त्या पद्धतीने खेळू शकला नाही.



कपिल म्हणाला, संघाची मानसिकता बदलली पाहिजे. या फॉरमॅटमध्ये तुम्हाला बेफिकीरपणे क्रिकेट खेळावे लागेल. इंग्लंडबद्दल बोलायचे तर त्यांच्या खेळाडूंची मानसिकता तशी तयार करण्यात आली आहे. ते आक्रमक फटके खेळण्यास अजिबात घाबरत नाहीत. इंग्लंड संघांच्या १०० धावा झाल्या तरी त्यांनी फटके मारणे कमी केले नाही. हा मूलभूत बदल त्यांनी त्यांच्या खेळण्याच्या शैलीत केलेला आहे. या टी-२० क्रिकेटच्या प्रकारात तुम्हाला जर यश मिळवायचे असेल, तर तुम्हाला पारंपरिक पद्धतीने फलंदाजी करून चालणार नाही. तिथे तुम्हाला आक्रमक पद्धतीनेच फलंदाजी करणे आवश्यक आहे, कारण ती आताच्या क्रिकेटची काळाची गरज आहे. क्रिकेटदेखील जग बदलत तसे बदलत आहे हे भारतीय संघातील खेळाडूंनी लवकरात लवकर समजून घेणे आवश्यक आहे.

आजच्या काळात खूप काही बदलले असले तरी संघाने वेगवेगळ्या फॉरमॅटनुसार तयारी करायला हवी. तिन्ही फॉरमॅटसाठी वेगवेगळ्या खेळाडूंचे ग्रुप तयार करून संघ तयार केले पाहिजे आणि जो संघात स्थान मिळवण्यास पात्र नाही त्याला काढून टाकण्यासाठी कठोर निर्णयही घेतले पाहिजेत, असे स्पष्ट मत कपिल देव यांनी व्यक्त केले.

ते पुढे म्हणाले की, आम्ही जेव्हा पहिल्यांदा विश्वचषक जिंकलो तेव्हापासून आतापर्यंतच्या क्रिकेटमध्ये जमीन-आसमानाचा फरक पडला आहे. आता तुम्हाला कशाचीही कमतरता नाही. त्यामुळे मैदानावर चांगली बांधिलकी दाखववी लागेल. आज तुम्हाला चांगले प्रशिक्षक मिळू शकतात. टी-२० क्रिकेटची संपूर्ण रचना वेगळी आहे आणि तुम्हाला ती आणावी लागेल. बीसीसीआयने कठोर पावले उचलणे गरजेचे आहे.

## दारुण पराभवानंतर हार्दिक पांड्या निराश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० विश्वचषक स्पर्धेतील भारतीय क्रिकेट संघाचा प्रवास इंग्लंडविरुद्धच्या पराभवानंतर संपला. हा पराभव भारतीय खेळाडू आणि समर्थकांसाठी वाईट स्वप्नापेक्षा कमी नाही. दरम्यान, भारताचा अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्याने एक संदेश लिहिला आहे.



हार्दिकने त्याच्या ट्विटरवर काही फोटो शेअर करताना एक मेसेज लिहिला आहे. तो म्हणाला, निराश आहे, दुखावलो आहे, धक्का बसला आहे. हा निकाल स्वीकारणे आपल्या सर्वांसाठी कठीण आहे. मी माझ्या सहकारी खेळाडूंसोबतच्या नात्याचा आनंद लुटला आहे. आम्ही प्रत्येक टप्प्यावर एकमेकांसाठी लढलो. आमच्या समर्थन कर्मचाऱ्यांच्या अनेक महिन्यांच्या समर्पण आणि कठोर परिश्रमाबद्दल धन्यवाद.

हार्दिक पांड्या आपल्या चाहत्यांसाठी म्हणाला की, आमच्या चाहत्यांसाठी ज्यांनी आम्हाला सर्वत्र साथ दिली आम्ही त्यांचे सदैव ऋणी आहोत. असे व्हायला नको होते, पण आपण त्यात लक्ष घालू आणि संघर्ष सुरूच ठेवू.

## खोपोलीच्या धोटे शिशुमंदिरचे बुद्धिबळ स्पर्धेत वर्चस्व



(छाया : विनायक माडे)

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाच्या वतीने आयोजित खालापूर तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा नुकतीच खोपोली येथील जनता विद्यालयात झाली. या स्पर्धेत डॉ. रामहरी धोटे शिशुमंदिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वर्चस्व मिळविले.

स्पर्धेचे उद्घाटन अंकित जोशी यांच्या हस्ते झाले, प्रमुख पाहुणे म्हणून जनता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका दिशा राणे, शिशुमंदिरच्या पर्यवेक्षिका सुनिता चव्हाण, जनता विद्यालयाचे पर्यवेक्षक संजय नेमाने उपस्थित होते. स्पर्धा प्रमुख म्हणून क्रीडा शिक्षक जनता विद्यालय ज्युनिअर कॉलेजच्या धनश्री गोंडा यांनी जबाबदारी बजावली.

या स्पर्धेत शिशुमंदिरचे १२ विद्यार्थी विजयी झाले. यामध्ये १४ वर्षाखालील गटात मुलींमध्ये सुखदा चव्हाण, सिद्धी ढोकळे, अलिशा शेख, आर्या मुंडे, मुलांमध्ये हिमांशू चव्हाण, स्वरूप बारड, आर्यन बिडकर, आर्यन पडवलकर, धीरज मोरे, १७ वर्षाखालील गटात मुलींमध्ये रिया दळवी, तनीषा चिले, जैनी ओसवाल, मुलांमध्ये साहिल गोंड हे सर्व विद्यार्थी विजयी झाले. या सर्व विजयी खेळाडूंची रायगड जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक अमित विचारे, योगेश भोसले, स्वप्नाली देशमुख यांनी मार्गदर्शन केले. शाळेचे चेअरमन विजय चुरी, मुख्याध्यापिका झांसी ऑगस्टीन व शिक्षकांनी यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com